श्री साईनाथ प्रसन्न

# श्री साईलीला

## मासिक

वर्ष १७ ] शके १८६२ चैत्र, वैशाख, ज्येष्ठ. [ अंक १-२-३

बाबा बाबा. निशिदिनि मना बोल रे बोल बाबा ॥
बाबा नामीं, कितितरी असे दिला उद्धर अबला ॥



बा बाल्हिम, त्यज शरण जा त्या न गुणा नबाबा ॥
बा बाबा ना. दुज यमगुहीं जावयाचें ऊबाबा ॥

नळिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशयचपलम् ॥
क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णवतरणे नौका ॥१॥

—शंकराचार्य

संपादकः—रामचंद्र वासुदेव वैसास

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
| --- | --- |
| संपादकीय ... ... ... ... ... ... | |
| गुरु–प्रसाद–याचना–दर्शक ... ... ... ... | १४५–१४७ |
| कै. माधवराव उर्फ श्यामा ... .... ... ... | १४८ |
| रामनवमी ... ... .... ... ... ... | १४९ |
| श्रीसद्‌गुरु साईबाबांची प्रार्थना ... ... ... ... | १५०–१५१ |
| भूपाळी ... ... ... .... .... .... | १५२ |
| सेंट रबिया वरून अनुवाद ... ... ... ... | १५३–१५९ |
| श्रीराम नवमी उत्सव ... .... .... ... .... | १६०–१६३ |
| श्रीरामनवमी उत्सव ( जमाखर्च ) .... ... ... .... | १६४–१७६ |
| [illegible]र्डीवृत्त ( मार्च, एप्रिल, मे ) ... ... .... ... | १७७–१८२ |
| गुरुपौर्णिमा .... ... .... ... ... ... | १८३–१८४ |
| अनुभव ... ... .... .... ... ... | २१–३४ |


## श्रीसाईभक्तांस विनंती

पुष्कळ भक्तमंडळींच्या पत्त्यांत फेरफार झाल्यामुळें त्यांना पोष्टांतून पाठविलेल्या उत्सवांच्या निमंत्रणपत्रिका व प्रसाद न पोहचतां परत येतात तरी कृपा करून त्यांनीं आपले पत्ते फेरबदल झाल्यास ऑ. चिटणीस रा. रा. श्री. ना. खारकर, ३७ चरई रोड, ठाणें यांस कळवावें.

भक्तांनीं आपले अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध करण्याकरितां कृपाकरून खालील पत्त्यावर पाठवावेत. ज्यांना आपलें नांव प्रसिद्ध होणें नको असेल त्यांनीं आपलें टोपण नांव व आपला पत्ता कळवावा म्हणजे तशी व्यवस्था होईल

## वर्गणीदारांस विनंती

ज्यांनीं चालू सालची म्हणजे शके १८६२ ची वर्गणी ३ रु. ६ आणे अद्याप पाठविली नाहीं, त्यांनीं कृपाकरून ती खालील पत्त्यावर मनिऑर्डरनें पाठऊन द्यावी. अथवा व्ही. पी. करण्याचें सुचवावें, म्हणजे ३ रु. ९ आ. ची व्ही. पी. करणेंत येईल.

रा. वा. घैसास, संपादक.

श्रीसाईनाथ,

# संपादकीय.

खालील इंग्रजी लेखांत नमूद केलेप्रमाणें " साईसुधा " नांवाचें स्वतंत्र इंग्रजी मासिक बाबा भक्ती प्रचारकार्याकरितां मद्रास भक्तांनी " श्रीसाईबाबा शिरडी संस्थानचे केवळ प्रेम सहकार्यानें सुरू केलें असलेमुळें शके १८६२ चे चालू सालपासुन " श्रीसाई-लीला " पुर्वीप्रमाणें केवळ मराठींतच चालू राहील.

संपादक, श्रीसाईलीला.

# SAI SUDHA

## OURSELVES.

Sri Sai Baba, as is now well known to the people of South India, who a Maharashtra saint, who flourished during the first quarter of this century. Many of his disciples are still happily with us, and those who read Sri. B. V. Narasimhaswami's symposium of his devotees' experiences will get some idea of the strength of his influence. It is a remarkable but heartening fact that even in these days of communal rancour and religious exclusiveness Sri Sai Baba should number among his disciples men of all castes and creeds, Moslems no less than Hindus. In this respect, he recalls no figure in the long and chequered history of our country so readily as Kabir. Indeed it is on record that Sri Sai Baba once declared that he was a reincarnation of Kabir.

If the practice of religion is pursued with the fundamental sincerity and comprehensive toleration preached and exemplified by Sri Sai Baba, the world will have taken a long step towards the consummation of peace on earth and goodwill among men, and it is in the hope that some humble service may be done to this great cause that we have ventured to start this magazine.

There is already a Journal **Sai Leela Masik,** published in Bombay, but as it is in the Marathi language it is not found so useful in this part of the country. We are glad to be able to announce that the publishers of Sri **Sai Leela Masik** have heen kind enough to assure us of their full co-operation and support. They will discontinue the English portion of their journal, and they have also agreed to divert their South Indian subscribers to us.

It is proposed to publish in this magazine articles in three languages, Englieh ( mainly ), Tamil and Telugu. We intend primarily to reach South Indian readers, but have every hope that all who are interested in religion, wherever they may be, will find it possible to give us their support and encouragement.

**EXTRACT FROM**

" NEWS & NOTES

IN

# SAI SUDHA

Vol. 1, June 1940, No. 1.

"1. We may inform the Madrasee subscribers of the Bombay *Sai Leela Masik* that that journal will not be publishing a part in English as it has been doing during the last year, and that it will be wholly Mahrathi hereafter. Those who wish to have a Sai journal in English will find that this **Sai Sudha** is the only one dealing with **Sai baba's** life, teachings & c. This journal is not connected with the Bombay Journal either financially or legally. Hence persons wishing to subscribe for **Sai Sudha** have to apply to the Publisher, 39, Anderson Street, G. T., Madras.

This Journal will of course not deal with Politics & will not admit articles or correspondence favouring of political partisanship."

# Request to Devotees

Dr. S. S. Ugrankar M. R. C. P. (London) Hon.-Physician to Sir J. J. Hospital has been taking very great and devotional interest in keeping the Shree Sai Baba Sarvajanik Charitable Dispensary in Chikhalwadi, Grant Road, a going and it is through Dr. Ugrankar's selfless work in this Dispensary of Sai Baba that very large number of very poor people are getting adequate medical relief. Dr. Ugrankar is contesting a seat on the University Senate through Registered Graduate's Constituency. I, therefore consider it my duty to appeal to all the devotees of Sai Baba to kindly make it a point to give their First preference vote to Dr. Ugrankar and also to induce their friends to do the same which in my opinion will be service and devotion to Sai Baba.

MORESHWAR W. PRADHAN

9-6-40

## श्री साईबाबा



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वतो योजनैकम् ॥
प्रादुर्भूत्वाऽस्मभूत्याऽनिशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः॥

शके १८६२ ) श्रीसद्गुरु साईनाथ ( वर्ष १६ अंक १–२–३

### श्री साईनाथ.

# गुरु-प्रसाद-याचना-दर्शक

रुसो मम प्रियांबिका । मजवरी पिता ही रुसो ॥
रुसो मम प्रियांगना, । प्रियसुतात्मजा ही रुसो ॥
रुसो भागिनी बंधु ही । श्वशुर सासुबाई रुसो ॥
न दत्तगुरु साई मॉं, । मजवरी कधी ही रुसो ॥ १ ॥

रुसो न सुनबाई त्या । मज न भ्रातृजाया पुसो ॥
पुसो न प्रिय सोयरे, । प्रिय सगे न ज्ञाती पुसो ॥
पुसो सुहृद ना सखा । स्वजन नाप्त-बंधु पुसो ॥
परी न गुरु साई मा । मजवरी कधी ही रुसो ॥ २ ॥

---

१ आई, माता. २ स्त्री, बायको. पत्नी. ३ सुत-मुलगा. आत्मजा मुलगी.
४ आई ५ भावजय ६ निष्काम मित्र ७ सकाम मित्र ८ न आप्त–नातेवाईक

पुसो न अबलो मुलें। तरुण वृद्ध ही ना पुसो ॥
पुसो न गुरु धाकुटें। मज न थोर सानें पुसो ॥
पुसो नच भलें बुरें। सुजन साधु ही ना पुसो ॥
परी न गुरु साई मा। मजवरी कधीही रुसो ॥ ३ ॥

रुसो चतुर तत्वावित्। विबुध प्राज्ञ[5] ज्ञानी रुसो ॥
रुसो हि विदुषी[6] स्त्रिया। कुशल पंडिता ही रुसो ॥
रुसो महिपती [8]यती। भजक तापसी ही रुसो ॥
न दत्तगुरु साई मा। मजवरी कधी ही रुसो ॥ ४ ॥

रुसो कवि, ऋषी, मुनी। अनघ सिद्ध योगी रुसो ॥
रुसो ही गृह देवता। नि,[11] कुल, ग्राम देवा रुसो ॥
रुसो खेलें पिशाच्च ही। मलिन[14] डाकिनी[15] ही रुसो ॥
न दत्तगुरु साई मा। मजवरी कधी ही रुसो ॥ ५ ॥

रुसो मृग[16] खग[17] क्रिमी[18]। अखिल जीव जंतू रुसो ॥
रुसो विटप प्रस्तरां। अचल आपगा [23]अंधी रुसो ॥
रुसो ख पवना ग्निवार:। अवनि, पंचतत्वें रुसो ॥
न दत्त-गुरु साई मा। मजवरी, कधी ही रुसो ॥ ६ ॥

---

१ स्त्रिया २ वडील ३ लहान ४ वेदांती ५ शहाणे ६ (अज्ञानी) विद्वान ७ राजा ८ संन्यासी ९ भक्त १० निष्पाप ११ आणि, व १२ दुष्ट १३ भूत १४ पापी, १५ विवशी. १६ पशु १७ पक्षी १८ कीटक १९ झाड २० दगड २१ पर्वत डोंगर २२ आपगा--नदी २३ अब्धि=समुद्र २४ आकाश २५ वायू २६ अग्नि--तेज २७ अप=पाणी २८ पृथ्वी

रुसो विमल किंनरा । अमल यक्षिणी ही रुसो ॥
रुसो शशि खगादि ही । गगनिं तारका ही रुसो ॥
रुसो अमरराज ही । अदय धर्मराजा रुसो ॥
न दत्तगुरु साई मा । मजवरी कधी ही रुसो ॥ ७ ।

रुसो मन सरस्वती । चपल चित्त तें ही रुसो ॥
रुसो वपु, दिशाखिलां । कठिण काल तो ही रुसो ॥
रुसो सकल विश्व ही । भयि तु ब्रम्हगोल रुसो ॥
न दत्तगुरु साई मा । मजवरी कधी ही रुसो ॥ ८

विमूढ म्हणुनी हसो । मजन मत्सराही डसो ॥
पदाभिरुचि उल्हसो । जनन कर्दमी ना फसो ॥
न दुर्ग धृतिचा धसो । अशिव भाव मागे खसो ॥
प्रपंचि मन हे रुसो । दृढ विरक्ति चित्तीं ठसो ॥ ९ ॥

कुणाचि हि घृणा नसो । नच स्पृहा कशाची असो ॥
सदैव हृदयीं वसो । मनासि ध्यानिं साई वसो ॥
पदीं प्रणय वोरसो । निखिल हृदय बाबा दिसो ॥
न दत्तगुरु साई मा । उपरि यांचनेला रुसो ॥ १० ॥

ठाणे. मुक्काम माघ कृ. १४ शके १८६१ **बाबांचे बाळ**
दिनांक ७—३—४०

१ शुद्ध २ यक्ष ३ निर्मल ४ अंतरिक्ष निवासी जनाच्या स्त्रिया ५ चंद्र ६ खग–सूर्य आदि नवग्रह ७ आकाशांत ८ नक्षत्रें ९ इंद्र १० निर्दय ११ यम १२ वाचा १३ शरीर १४ दिशा× अखिला–सर्व दिशा १५ सर्व व्यापक काळ १६ माझे ठिकाणीं १७ त्रिभुवन १८ मूर्ख १९ मत्सर–अहि–हेवा, परोत्कर्ष द्वेषरूपी सर्प २० गुरुपदाची आवड २१ आनंद पावो २२ जन्मरूपी चिखलांत २३ किल्ला २४ धैर्याचा २५ ढासळो २६ अकल्याण कल्पना २७ द्वेष २८ इच्छा २९ गुरुपदीं ३० प्रेम ३१ पान्हा फुटो ३२ सर्व ३३ जग ३४ वरील ३५ भिक्षा घालण्यास.

# कै. माधवराव उर्फ श्यामा

( चाल—गुणी बाळ असा अजि अक्रूर हा ]

किती निर्घृण हा दण्डधारि यमराज ॥ दण्डितो विश्व निर्व्याज ॥ ध्रु ॥
जरि मृत्यू हा टळत कुणाला नाहीं ॥ बेचैन जीव परि होई ॥
देखुनि हा ऐसा पाश टाकितो जीवा ॥ लौकैक अलौकिक जीवा ॥
काळें विस्कटुनिया आमचें पूर्ण सुराज ॥ दण्डिली शिर्डी निर्व्याज ॥

माधवजी निघुनी गेले ।
काळानें करणें केलं ।
दुःखाचे कड ओघळले ।

या शिर्डीला नाहीं आज कुणी राज ॥ दण्डिले भक्त निर्व्याज ॥–१ ॥
श्रीसाईंचा आदिपणाचा भक्त ॥ मोहांत नसे आसक्त ॥
श्रीसाइसखा दृष्टी पडता त्वरित ॥ लागला भजनिं हा मुदित ॥
तव देखुनिया त्याचा भाव विराज ॥ निर्मिला ' श्याम ' निर्व्याज ॥

श्री साई हृदयीं ठसता ।
बाणली पूर्ण निर्गुणता ।
वेधले हृदय त्या चित्ता ।

त्या चित्ताला दिसला एकच राज ॥ श्रीसद्गुरु साईराज ॥—२ ॥
ह्या मार्गानें सेवुनि साई अपार ॥ जाहला पैलतीर पार ॥
तो श्यामसखा आजि अम्हां अंतरला ॥ दुर्दैवगिरी कोसळला ॥
त्या मरणाला जिंकूनि पूर्ण हा राज ॥ शोभला भक्त निर्व्याज ॥

शिर्डीस नाहीं कुणी त्राता
श्यामाच्या मागें आतां ।
सांवरेल कोण तिज नेता ।

हा दुर्दैवा ! काय मिळविलें त्वां आज ॥ दण्डुनि विश्व निर्व्याज ॥–३ ॥

५—५—४०

सोलापूर

—साईकिशोर.

# रामनवमी.

सोज्वल मंगल नवमीचा हा दिन उदयी आला
सुप्रभाती सुरम्यकाली रवि क्षितिजी आला,
तोडुनि सारा पाशपसारा उज्वल मायेच्या;
सदनी सारे भक्त पातले साई माउलिच्या.—१॥

दिशा फांकली अरुण उगवला दुमदुमते भेरी
महावैभवी काकड-आरती होत उषःकाळीं
मंगल ध्वनि तो दिशा निनादे भक्त संघ खडबडे
आळस सारा दूर झाडुनि सज्ज होई तडफडे.—२॥

मध्यान्हीसी उभी ठाकली भक्तसखी भावडी
भाविक सज्जन भरुनि आणिती गंगेच्या कावडी
महाभिषेके पूजा करिती सद्‌गुरुरायाची
दिव्याभरणीं स्मृति सजवती साइबाबाची—३॥

दिव्य सोहळा पाहुनि स्वर्गीय वृत्ति विरामलि मंदमति
धन्य जनांची शैलधि जाईल पूर्णत्वा या जगतीं

शिर्डी
रामनवमी १९४० —साईकिशोर.

॥ श्री ॥

# शके १८६२ सन १९४० शिरडी येथील रामनवमी उत्सवा निमित्त

# श्री सद्‌गुरु साईबाबांची प्रार्थना.

प्रार्थना करणार;—श्रीयुत केशव मोहनीराज पंडित,

पेन्शनर मामलेदार, नाशिक.

( आर्या—गीती—वृत्त )

( १ )

गुरुब्रम्हा; गुरुविष्णू; गुरुशंकर; घोकितों असें फार.
व्यर्थची उच्चार !!! परि; जोंवर नाहीं मनीं चमत्कार.

( २ )

हाचि चमत्कार, मनीं भक्तींचें चांदणें, पडे गार,
गुरु–शिष्य–भेट, हृदयीं, नित्य घडे, उभयतां जरी दूर.

( ३ )

साक्षात्कार, खरा हा, गुरुचा सहवास, नित्य, हृदयांत;
संवाद–सौख्य, संतत, लाभे, व्यवहार करुनि, एकांत.

( ४ )

त्रिपुटी, संसाराची, "तन–मन–धन" करुनि, शुद्ध, संपन्न;
संसार, मोक्षमय, हा, गुरु करिती; "ज्ञान–भक्ति संपन्न."

( ५ )

वरदान हेंच द्यावें; हीच असे, प्रार्थना, प्रभो ! चरणीं
केशव पण्डित, विनवी; श्रीगुरुबाबांस, शरण जावोनी.

[ श्री सद्‌गुरु सांईबाबांचे चरणीं ही प्रार्थना भक्तिभावानें समर्पण केली आहे. ]

शुभं भवतु

॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥

रामनवमी दिनीं काय पुसतां माझ्या साईचा थाट
येऊनी भक्तमंडळी केला गंगा यमुनेचा घाट ॥
आतां कशाला काशी प्रयाग आऊयां शिर्डी ग्रामीं
करूया आपल्या सार्थक देहाचे दर्शन देई स्वामीं ॥

साईचरणीं अर्पण

साईदास

१६–४–४० रा. मा. धुमाळ

वेड लागले माझ्या मनाला आपुले साई
कंठ शोषला मम झाली दर्शनाची घाई
जन्मुनी काय केले म्यां गेले दिवस सर्व वाया
अतां पतित मी चरणीं
अर्पुनी पुनीत करीं माझी काया

रा. मा. धुमाळ.

साईदास

चरणीं अर्पण.

# भूपाळी

[ चाल:—झाली प्रभात झाली ]

ऊठ ऊठ साईनाथा—झाली प्रभात आतां ॥ ध्रु० ॥

प्रगटे नवीन दीप्ती—दाही दिशांतुनीया ॥
नाभिं तारकादिकांना—नुरला प्रकाश पुरता ॥ १ ॥

कुसुमें प्रफुल्ल बनुनी—सौगंध युक्त झालीं ॥
वाहे तयांवरूनीं—वायूहि सौख्यदाता ॥ २ ॥

संगीत निर्झरांचें—चैतन्य दे जगाला ॥
रंगूनि मधुप गेले—त्याच्या सुरास धरितां ॥ ३ ॥

सृष्टी शिरावरी हें—नभ ओपि हिम तुषारा ॥
द्विज कूजनें करोनी—म्हणुं लागलें सुमंत्रा ॥ ४॥

आली उषा पहा ही—खाणि काय मंगलाची ॥
उधळावया म्हणोनी—धरि तें गुलाल हातां ॥ ५ ॥

तव भक्तमंडळीही—घेऊनि माळ हातां ॥
कां कष्टवीसि बापा—करि दूर ' दासचिंता ' ॥ ६ ॥

टेकवाडे
शिरपूर ता. १८-४-४०

साईबाळ

## ' श्रीसाईनाथ '

### सेंट रबिया

दिव्हिजन अंक ७ एप्रील १९४० नं. ७ सी. एस्. रामस्वामी—

वरून अनुवाद—

काय अजब ही जादू ! ! ह्या अवाढव्य अवनीतलावर कित्येक नरनारी संतरत्नें होतात व विराम पावतात. अगदी योग्य उपमा आंग्ल कवि Wordsworth यानें दिली आहे ती कोणती ? तर Modest Violet कित्येक सर्वगुण संपन्न पुष्पें दररोज उमलतात व माती-मोल होतात. त्यांचा काय हिशोब ? ती कीर्ती रूपें उरतात का ? परन्तु विधात्याची करणी खरोखरच कांहीं और आहे ! ! ! की त्यानें मानवास बुद्धी व वाचा ह्या दिव्य देणग्या देऊन त्याला आपला ऋणी करून ठेविले आहे. काय आश्चर्यकारक करणी ! एक मनुष्य-रहातो कोठें ? करता काय ? कोठकोठें प्रसिद्धी करून ठेवितो !

आपल्या हिंदुस्तानात आज पावेतों कित्येक संतश्रेष्ठ झाले; व त्यांची कीर्ती कोठपर्यंत पसरली ? अगदी एकच उदाहरण पहा:— ' संत तुकाराम ' शब्दरूपानें तर त्याची कीर्ती पसरली आहेच व होती पण त्यानें चित्रपट सृष्टिही प्रवेश करून आज त्याचा सर्व जगांत पहिला नंबर लागला आहे—त्यामुळें त्याची कीर्ती कोणाच्या कानावर नसेल हाच मोठा प्रश्न आहे.

अगदी तद्वत सेंट रबिया हें एक नारीरत्न खिस्ती सनापूर्वी ७१७ मध्यें बसरा येथें होऊन गेले. तिच्या जन्माच्या वेळच्या गोष्टीवरून तिच्या घराण्याच्या गरिबीची कल्पना येतें. ही जन्मास आली, तेव्हां घरांत—दिव्यांत घालण्यास तेल सुद्धां नव्हतें किंवा तिला अंगाभोंवती गुंडाळण्यास कपडे सुद्धां नव्हतें.

खरोखर ह्या जगाची रीत—" मेल्या म्हशीला मणभर दूध " ह्या म्हणीनें स्पष्ट केली जाते. अशा स्थितींत त्या बिचाऱ्या बापाला कांहीं सुचेनासें झालें—पण त्यानें भीक मागितली नाहीं—तसा त्यानें कटु अनुभवावरून निर्धारच केला होता—तर मोठ्या युक्तीनें त्यानें तो बिकट प्रसंग निभावून नेला—विधात्याला खरोखर प्रत्येक मानवाबद्दल कळकळ असतें—त्यानें त्या बापाच्या रात्री स्वप्नांत जाऊन—त्यानें एका—ईश्वरभक्त पण विलासामुळें भुरळ पडलेल्या अमीरास पत्र लिहिण्यास सांगितले व ही मुलगी पुढें महत्पदास चढेल अशी सूचना दिली. लगेच त्या अमीराच्या मनावर परिणाम झाला कि

एक भलीमोठी रक्कम त्यानें दंड म्हणून रबियाच्या बापास पाठवून दिली व त्याचे फार आभार मानलें.

झालें. परमेश्वर तरी किती निर्दय बनतो ? लौकरच त्यानें राबियाचे आईबापास आपल्या सेवेस हिरावून नेलें व रबियास पोरकी करून ठेविलें ! आपत्तींचा क्रम सुरु झाला–बिचारीची नुकतीच शिशु–अवस्था संपून बालावस्थेस सुरवात झाली होती–त्यांत याचकावस्थेचें कट्ट फटकें बसूं लागलें मग काय बिचाऱ्या पोरीची स्थिती विचारतां ? हायरे दैवा! इतक्या वर तरी थांबावयाचें होतेस ! छट् आपत्तींचा ससेमिराच लागलेला तो ! ! तो काळ गुलामगिरीचा काळ–झालें एकदां एक धनलुब्ध गृहस्थानें तिला पकडून जवळच नेऊन विकून टाकलें.

गुलामगिरी सुरूं झाली. काय हि परमेश्वराची अंत पहाण्याची कमाल ! ! गुलामांची किंमत ढोरापेक्षांसुद्धां कमी लेखली जात असे–काय पोरीचे हाल हे ! ! ! बिचारा भिकारी २४ तासांतून एक क्षणभर तरी आपल्या स्थितींत हांसेल पण गुलामास स्वतःची काळजी घेण्यास वा स्वतःकडे पहाण्यास वेळच मिळत नसे.

जरा कुरकुर केल्यास सोट्या पाठींत बसे. आटोक्या बाहेरील काम करावें लागे. बिचारीला कैवारी कोणीच उरला नाहीं. प्रभो काय ही स्थिती ! !

असें होतां होतां आतां ती स्वाभाविकच यौवनावस्थेंत आली तोंच तिला एका दुष्ट माणसानें दगा दिला. तो तिच्याशीं लघळपणानें वागूं लागला व अशा स्थितींत ती एकदां पळून जाण्याचा प्रयत्न करीत असतां तिचें मनगट जबरदस्त दुखावलें. त्याच स्थितींत ती बिचारी पडून राहिली व देवाचा सारखा अखंड धावा करूं लागली–व ती देवास विनवूं लागली कीं, 'हे नारायणा मी आहे ह्या स्थितींत मला अत्यानंद होत आहे, पण माझी एकच मागणी आहे ती म्हणजे–तुझें नांव माझें सदैव मुखीं राहो. ही तिची करुणाजनक स्थिती पाहून–पाषाणसुद्धां द्रवला असतां मग जगचालक गहिंवरला यांत नवल काय ?' एकदम आकाश वाणी झाली:—“ बाळे, शांत हो आज तुझी सामान्य जन टवाळी करतात म्हणून तूं बिथरून जाऊं नकोस तर पुढें माझें उत्तमोत्तम भक्तसुद्धां तुझी पाठ पुरवतील. ” हे शब्द ऐकून ती अत्यानंदली. व एकेश्वराच्या पूर्ण भजनीं लागली.

एके रात्रीं ती भजनांत दंग असतां तिला तिच्या मालकानें पाहिलें त्याबरोबर तो चरकलाच—त्यांस ती प्रत्यक्ष तेजस्वी देवताच दिसली; लगेच त्यानें सकाळीं 'तूं स्वतंत्र आहेस मी तुला पूर्ण मोकळी केली आहे मला माफ कर' असें शब्द त्यानें उच्चारिलें. त्याबरोबर ती एका एकांत स्थळीं निघून गेली.

पुढें अशी एक गोष्ट घडली कीं, ती एकदां मक्केच्या यात्रेस जात असतां अर्ध्या-प्रवासांत तिचे ओझे वाहणारें गाढव यमसदनीं निघून गेलें; दुसरे अनेक यात्रेकरू जात असतां तिला आपल्या बरोबर येण्यास विनवूं लागलें पण ती गेली नाहीं तर ती तेथेंच बसून देवाची करुणा भाकूं लागली--ती म्हणत होती कीं माझा कोणावर विश्वास नाहीं तर एकट्या परमेश्वरावरच माझा विश्वास आहे. तोंच तें गाढव जिवंत होऊन ती बरोबर वेळेवर मक्केस पोहोंचली. काय दांडगी तपश्चर्या ही ! ! !

दुसरी मजेदार गोष्ट म्हणजे एकदां तिच्या घरांत चोर शिरला व तो तिचा बुरखा पळवून नेण्याचा प्रयत्न करूं लागला पण बुरखा हातीं घेतला कीं त्यांस बाहेर पडण्याचा मार्गच दिसेनासा होत असें असें त्यानें सात वेळा करून पाहिले पण व्यर्थ शेवटीं त्यानें बुरखाखालीं ठेवला तेव्हां त्यांस मार्ग दिसला व एकदम त्याला दैवी वाणी ऐकूं आली. 'अरे मूर्खा, जिनें देवावर ( मजवर ) विश्वास टाकला आहे तर मी तरी तिला कसा विसंबूं.'

ती शेवटपर्यंत अविवाहीत राहीली. तिला पुष्कळ चांगली चांगली अमीरउमरावांची स्थळें आलीं होतीं. ती असें म्हणत असे कीं मी कोणास गुलाम करून घेणार नाहीं व क्षणभरसुद्धां ईश्वर चिंतनास विसंबणार नाहीं. तिला कितीही भयंकर स्वरूपाच्या वेदना झाल्या तरी ती आपली ईश्वर भजनांत तल्लीन असे.

ती एका फाटक्या--तुटक्या चटईवर बसे. जवळच एक फुटकें मडके पडले होते त्यांतून ती पाणी पीत असे. एका गृहस्थानें आपल्या श्रीमान मित्रांकडून तिची सर्व व्यवस्था ठेवण्याची तजवीज केली. त्यावर ती म्हणाली, हे सुज्ञा, तुला वाटत असेल परमेश्वर मला विसरला असेल पण ही तुझी कल्पना चुकीची आहे. ती म्हणे जितका वेळ ईश्वर चिंतनांत गेला तोच खरा वेळ होय. एकदां एका धार्मिक गृहस्थानें तिच्या बरोबर सर्व रात्र ईश्वर भजनांत घालविली व सकाळीं तिला विचारले आपली प्रार्थना रुजुं झाली. किंवा नाहीं ते कसें समजावें ? त्यावर तिचें उत्तर दुसऱ्या दिवशीं उपवास करावा. व देवाची आठवण येते का जठराग्नि पेटतो--त्यावरून आपली प्रार्थना पोहचलेल्याचा कयास बांधावा.

ही साध्वी स्त्री चांगली वृद्धतम होऊन गेली. शेवटच्या घटकेच्या वेळेस तिनें सर्वांचा निरोप घेऊन सर्वांस युक्तिनें घालवून एकटी ईश्वर भजनांत गुंग झाली व हा आपला मृत्तिकारूपी देह ठेवून ती त्या दिव्याशीं एकरूप होऊन गेली.

संपादक श्री. साईलीला मासिक, पुणें ता. २८–४–१९४०

यांस सा. न. वि. वि.

श्रीएकनाथी भागवताचा ३ रा अध्याय वाचीत असतां त्यांत सद्‌गुरूची लक्षणे अवलोकनांत आली तेव्हां श्रीसाईबाबांची मूर्ती डोळ्यासमोर उभी राहिली तेथें दिलेली लक्षण श्री–साईमाउलीला तंतोतंत कशी लागू पडतात हे लक्षांत येऊन मनाला फार आनंद झाला त्यांत श्रीसाईलीला मासिकाचे वाचकांसही भागीदार करावें असें वाटून आपणास हा लेख लिहीत आहे. पसंत पडल्यास आपले मासिकांत छापावा.

श्रीसाईबाबा गुरुत्वाचा अहंभाव अणुमात्रहि धारण करीत नव्हते. तें आपणास भक्त म्हणवीत असत. "मै बंदा हूं" असे ते आपणांस म्हणवीत असत. ज्याचा जसा भाव असे तसे तसे त्याला ते पावत. तसा तसा त्याला अनुभव देत असत. शिष्यापासून सेवा कोणत्याही प्रकारची घेत नसत. शिष्य आपल्या भावार्थाने सेवा करीत. त्याना कशाचीच गरज नसे. स्वतः भीक्षा मागून भाकर तुकडा खात. इतकेंच नव्हे परंतु मिळविलेल्या कोळंब्यातील भाकरीतून इतर गोरगरीबांना वाटा देत असत. गहूं मागून आणून स्वतः दळीत व त्याची लापशी वगैरे करून अनाथाना वाटीत. यांचेवेळची जाती वगैरे अझून मशीदीत लोकांना पहावयास मिळतात. मशिदींचे मंडपांत त्यांचे वेळची चूल तशीच ठेविली आहे. शिष्याना श्री बाबा भगवद्‌रूप मानीत. सर्व लोक श्री. बाबांचें ऐकत परंतु श्रीबाबा बडे बाबांचें मुखांतून निघे तसे करण्याची बतावणी करीत त्यांचे योगक्षेमाचे संकट शिष्यांना कधीच पडत नसे. शिष्यांचे संकट मात्र–ते कीतीही मोठे व गाढे असले तरी निजांगानें निवारण करीत. सूक्ष्म रूपानें चोहींकडे संचार करून शिष्याना पावत व त्यांची दुखणी–भाणी अंगावर घेत. म्हणूनच ते आसेतू–हिमाचल प्रसिद्धीला आले. श्री सांईबाबांचे ठिकाणी विषयाचा भोगही दिसला नाही व निःशेष त्यागाचा आग्रहही आढळला नाहीं. भक्तानी गाद गिरद्या आणल्या तरी ते साध्या तरटावरच बसत. दुपारची आरती झाल्यावर गाद्या व मागील चांदीची प्रभावळ उचलून नेत असत व त्यानंतर दुसरे दिवशीचे माध्यान्हीचे आरतीचे वेळापर्यंत बाबा तरटावरच बसलेले असत. अंगांत एक पायघोळ कफनी असे तिच्या तुकडे-चिंध्या होईपर्यंत ती वापरीत असत. दक्षिणा घेत परंतु त्या संबंधानें सूक्ष्म विचार करणें जरूर आहे. दक्षिणेचा बाबानीं संग्रह कधीही केला नाहीं. ती ते कां व कशा करितां घेत असत हे अत्यंत गूढ आहे. आपला देह देह-प्रारब्धाचे विभागी लावून विचरत असत. देह गादीवर बसो-पालखींत चढो अथवा तरटावर पडो

त्या सुख दुःखाकडे श्री-बाबानी कधीच लक्ष दिले नाहीं. त्यांना गृहासक्ती नव्हती. देहाची अहंकृती नव्हती परंतु ते लोकासारखे वागत त्यांना लोक आपले सद्गुरू मानीत परंतु ते आपणास कोणाचा गुरू म्हणवून घेत नसत. मी भक्त आहे-मै बंदा हूं अल्ला-मियानें करामत केली मी येथें बोलतो तसेंच तिकडे होते असे ते म्हणत. त्यांचे जवळ गरीब-श्रीमंत, पापी पुण्यवान, चाहणारा-निंदा करणारा, हिंदू-मुसलमान, ब्राह्मण ब्राह्मणेतर वगैरे द्वैतभाव मुळीच दिसला नाहीं. त्यांच्यात कोणाचेही प्रेमाची आसक्ती दिसली नाहीं. त्यांचे वर्तन अचुंबीत दिसत होते. त्यांची लीला अघटित होती व कर्म अगाध होतें. कधीं कधीं ते अत्यंत उग्रता दाखवीत व इतके दुर्धर व भयानक दिसत की त्याचेजवळ जाण्याची भीति वाटत असे. एकदां चावडींत काकड आरतीचे वेळीं ते इतके उग्र झाले की मला त्यांची कृती वेड्यासारखी भासली. आरती करणारे बापुसाहेब जोग यांना खूप मार दिला. तात्या पाटलानें येऊन शेवटीं बापू साहेब जोगांना सोडविले. मला शंका आली ती गुरु माऊलीला लागलीच कळली. मी दुपारीं जवळ गेलो तेव्हां माझें पाठीवरून हात फिरविला व म्हणाले " अरे मी काय वेडा-बिडा आहे. मी वेडा नाहीं. मी भलत्या-सलत्याला मारीत नाहीं. जे मारायचे ते मारले जातील, तोडायचे ते तोडले जातील, फाडायचे ते फाडले जातील " ( खाली रेघ ओढलेलें वाक्य बाबा नेहमीं उच्चारीत). श्री बाबा परमार्थ स्पष्टपणानें कधींच बोलत नसत. " ध्वनिले बोले परमार्थ " त्यांची ब्रह्मस्थिती कळत नसे. समजत नसे. " मी लई हुशार पण राहण अस वेड्यावानीं ". " तो वाणी मला शिव्या देतो. मला बरें पहात नाहीं " वगैरे बोलत. असे असून प्रश्न हा की ते प्रसिद्धीला कसें आले याचें उत्तर ज्याचें त्यानेंच दिलें पाहिजे. त्यांचे जवळ लोकांना उद्धरण्याचे हजारो हजार मार्ग दिसत, त्यांचे लोकांना अनुभव येत. प्रत्यक्ष अनुभवामुळें श्रीबाबा देव झाले. माझे गुरुनीं मला केलें असें ते सांगत. माझा गुरु ब्राह्मण आहे. गुरुलाच सर्व करावे लागते. सदगुरू वाचून कांहीं सोय नाहीं, असे ते सांगत. माझे गुरुनीं मला मागेंच काढून वर नेले आहे. मला आतां ही वतनदारी मिळाली आहे. एक हजार वर्षाकरिता ही वतनदारी मला मिळाली आहे. मी सातासमुद्रापलीकडे नेईन. सात समुद्र निहाल होणें म्हणजे परमार्थ असा यावरून अंदाज लागतो सद्गुरूचीं लक्षणें वाचून माझे मनाला आनंद झाला म्हणून श्री. एकनाथी भागवतांतील ३ ऱ्या अध्यायांतील ओव्यासह हा लेख आपणाकडे पाठविण्याची इच्छा झाली.

कळावे लोभ असावा ही विनंती.

आपला नम्र

प्रो. ग. गो. नरके M. A. M. Sc. & c.

तस्मात् गुरूं प्रपद्येत जिज्ञासुः श्रेय उत्तमं ।
शाब्दे परेच निष्णातं ब्रह्मणि उपशमाश्रयं

भागवत अ. ३ रा ॥२१॥

आता सद्‌गुरूची जी निजलक्षणें । राया सांगेन तुज कारणें । जे ऐकतां अंतः करणें । सुखी होणें सद्भावें ॥ २९६ ॥ × × × × × × ज्याचा जैसा जैसा भावो । तैसा तैसा करी अनुभवो । तरी गुरुत्वाचा अहंभावो । अणुमात्र पहा हो धरीना ॥ २९९ ॥ शिष्या पासूनि सेवा घेणें । हे स्वप्नीही न स्मरे मने । शिष्याची सेवा स्वयें करणें । पूज्यत्व पाहणें निज शिष्या ॥ ३०० ॥ शिष्य देखावा पुत्रासमान । हें स्मृतिवाक्य असे प्रमाण । दृष्टी देखो नेणे गौण । शिष्या देखे पूर्ण ब्रह्मत्वें ॥३०१॥ शिष्य सेवा करी निज भावार्थे । परी तो सेवक न म्हणे त्यातें । ज्यासी भगवद्रूप सर्व भूतें । शिष्य वेगळा तेथें सेवकत्वें नुरे ॥ ३०२ ॥ ऐसा मी एक महायोगी हें ही न मिरवीं तो जगीं । गुरुत्वाचा ताठा अंगीं । सर्वथा शिगी[1] लागो नेदी ॥ ३०३ ॥ आपुल्या योगक्षेमाचे सांकडे[2] । स्वप्नीही न घाली शिष्याकडे । शिष्य संकट अति गाढे । निवारी रोकडे निजांगे जो ॥ ३०४ ॥ मी एक अकर्ता निजात्म योगी । म्हणौनी विषयांतें न भोगी । अथवा विषयो निःशेष त्यागी । हाही आग्रहो अंगी असेना ॥ ३०५ ॥ तो विषय भोगी ना स्वये त्यागी । तो अदृष्टाच्या निज विभागी । लावूनीया देहाच्या अंगीं । परब्रह्म योगी विचरत ॥ ३०६ ॥ देह दैवे पालखी माजी चढे । अथवा विष्टे माजी पडे । ते दोहीचे सुखदुःख त्याकडे । मी म्हणौनी पुढें कदा न रिघे ॥ ३०७ ॥ देही असोनी नाही अहंकृती । गेही असोनी नाही गृहासक्ती । शेखी लोकामाजी लौकिक स्थिती । सुखे वर्तती लोकांसरिसे ॥ ३०८ ॥ त्यासी स्त्री म्हणे माझा भर्ता । पुत्र म्हणे माझा पिता । शिष्य म्हणती गुरू तत्वता । तो त्याहूनी परता त्या माजीवर्तें ॥ ३०९ ॥ ऐशिया पूर्ण प्रतीती । आचरोनी दावी हरी भक्ती । हरी भजावा सर्वांभूतीं । हेचि शिष्याप्रती उपदेशी ॥ ३१० ॥ एका अनुभवा आले ब्रह्म । फिटला बाध्यबाधकतेचा भ्रम । मोडले द्वैतभावाचें कर्म ।

१ शिगी लागो नेदी—पूर्णत्वास—भरास चढू देत नाही.

२ सांकडे—संकट.

जगीं विषम असेना ॥ २९२ ॥ परी अचुंबितें[1] वर्तणे । अघटमानें[2] कर्म करणें । अत्यंत उग्रता मिरवणें । दुर्धरपणें[3] भयानकु ॥ २९३ ॥ आपण आपणियामाजी हंसत । ध्वनितें बोले परमार्थ[4] । तथे बोधेना शिष्याचे चित्त । पडे दुश्चित ते ठायीं ॥ २९४ ॥ ऐसा जो वर्ते ब्रम्हज्ञानी । त्याची ब्रम्हस्थिती न मनें जनीं । मा कोण जाईल भाव धरोनी । बोधा लागोनी त्या पाशी ॥ २९५ ॥

प्रो. ग. गो. नरके एम्. ए. एम्. एस्सी.

---

१ अचुंबित—कोणाच्या प्रेमाचा, आसक्तीचा स्पर्श होऊ न देता.

२ अघटमान—विचित्र. कोणी करीत नाही असे.

३ दुर्धरपणे—ज्याचे जवळ कोणी जाऊ शकत नाहीं असा भ्यासूर.

४ नमन—कळत नाहीं, समजत नाही.

श्रीशंकर

# श्रीरामनवमी-उत्सव.

## शके १८६१

श्रीसच्चिदानंद सद्गुरू आधुनिक संत चुडामणी श्री साईबाबा महाराज यांच्या शके १८६१ च्या श्रीरामनवमी उत्सवाचा अहवाल जमाखर्च तपशील खाली लिहिल्याप्रमाणें आहे.

चालू सालीं उत्सवास आरंभ तारीख २८-३-१९३९ चैत्र शु. ८ शके १८६१ मंगळवार पासून झाला. व ता. १-४-१९३९ चैत्र शु. १२ शके १८६१ रोजी शनिवारी गोपाळकाला होऊन उत्सवाची समाप्ती झाली. या उत्सवास मुखेड, नांदेड, मांजरम, हिंपर्ग, नारनाळी, उमरी, मुतखेड, पाथरी, अजेगांव, खामगांव, मुंबई, नाशिक, ठाणें, अंधेरी, नगर, बेलापूर, संगमनेर, बार्शी, सोलापूर, सातारा, कोल्हापूर, चिपळूण, वसई, जबलपुर, नागपूर, उमरावती, वगैरे ठिकाणाहून लोक आले होते पण मागील सालापेक्षां चालु सालीं लोक पुष्कळ कमी आले. याचे कारण कमिटीच्या लोकांत विनाकारण वाढत चाललेली दुही ईच असावें असें वाटतें. रामनवमीच्या दिवशी गंगेच्या कावडी नेहमीं प्रमाणें अडीचशें पावणें तीनशें पर्यंत आल्या. त्यांत शिरडीच्या लोकांचा भरणा विशेष होता. बाहेरगांवच्या लोकांच्या पांच पन्नास कावडी आल्या असतील. त्या कनकोरी, निघोन, लिबगांव, सई, सावळविहीर, नांदुरकी वगैरे ठिकाणच्या लोकांच्या होत्या. कावडी आणण्याच्या कामांत सर्व जातीचे व पंथाचे लोक होते. दुपारीं रामजन्म होऊन जिलेबीचे प्रयोजन झाले. जेवणास सुमारे हजार बाराशे लोक जमले असतील असा अंदाज आहे. दुसरें दिवशीं गूळ शिऱ्याचें भोजन झाले. या दिवशींही साताठशें पान झालें असावें. रामनवमीस रात्रीं मुसल्मान लोकांचा संदल आला होता. त्यानीं आपल्या धर्माप्रमाणें श्री साईबाबांचें समाधीस चंदन चढवले. दोन तीन गलफही अर्पण झाले. रामनवमीच्या दिवशीं संध्याकाळीं निशाणांची मिरवणूक निघून ते समाधीवर व मशिदींत लावले गेले. रात्रीं १२-च्या पुढें शोभेचें दारूकाम झालें. दारू ७५ रुपयांची सुटली. या सालीं दारू पूर्वीप्रमाणेंच पन्नासाची सांगितली होती, कांहीं लोकांच्या आग्रहावरून चालु सालापुरती पंच्याहत्तरची सोडली

गेली. दशमीचें दिवशीं कुस्त्याचे हंगामांस दुपारून सुरवात झाली. चालू सालीं हंगाम मागच्या हंगामाप्रमाणें भरला नाहीं. व गावची वर्गणी जमावी तशी जमली नाहीं. श्री साईबाबांचें पेटींत ६० रुपये निघाले. हंगामा रेडावत जाणें चांगलें नाहीं. याचा विचार कमिटीनें व गांववाल्यांनीं अवश्य करावा अशी नम्र विनंती आहे. हंगाम्यास प्रोत्साहन देणें हें सर्व बाजूनां श्रेयस्कर आहे. शिरडी गावांत दुफळी असल्यामुळें वर्गणी मागे जशी जमत होती तशी आतां जमत नाहीं. श्री साईबाबांच्या पेटींतही पैसे यावे तसे येत नाहींत. केवळ खर्चाच्या सबबीवर शिरडीच्या कुस्त्याच्या हंगाम्याला कमीपणा येऊं देऊं नये. गांवकरी लोक रीतसर हंगामा करण्यांस तयार नसतील तर ती व्यवस्था कमिटीच्या लोकांनीं हातांत घेऊन करावी.

आतां कमिटीचे म्हणणें असे असेल कीं हा हंगामा रामनवमीच्या उत्सवाला असतो तेव्हां तो हंगाम्याचा खर्च त्या रामनवमीच्या उत्सववाल्याने करावा. कमिटीवर त्याचा भार असूं नये. पण हे म्हणणे बरोबर होणार नाहीं. कारण दोन्ही उत्सवात पेटींत आलेली रकम उत्सववाल्याकडे खर्चांसाठीं जाते. तशी रामनवमीची स्थिती नाहीं. रामनवमीच्या उत्सवांत श्री साईबाबांची पांच दिवसांची पेटी हंगाम्याच्या खर्चाकरितां दिली गेली आहे. त्याबद्दल उत्सव करणाराची तक्रार नाहीं. पूर्वी प्रमाणेच हंगाम्याकरितां हल्लीही दिली जात आहे. असो कसेंही करून कमिटीने हंगामा भरभराटींत आणण्याचा विचार-करावा.

एकादशीच्या दिवशीं फराळाच्या व जेवणाच्या दोन पंक्ती झाल्या. त्या दिवशीं माणूस चार पांचशे झाले असेल. द्वादशीच्या दिवशीं गोपाळ काला होऊन बुंदीच्या लाडवांचे प्रयोजन झाले. हजार बाराशे पान झाले. हनुमान जयंतीच्या दिवशीं मारुतीस अभिषेक झाला. व भिल्ल, वडारी, चांभार, म्हार, मांग यांना गुळ शिऱ्याचे जेवण दिले. ते सगळे लोक मिळून तीनचारशे पान झाले असेल. मुसलमान लोकांत दुफळी झाल्यामुळें त्यानीं चालू सालचा शिधा अजून नेला नाहीं. परमेश्वर त्यांना लवकर सुबुद्धी देऊन ते साईबाबांचा प्रसाद घेण्यास येवोत अशी साईबाबांच्या चरणी विनंती आहे.

उत्सवाच्या आधीं पाणी चांगले राहावे म्हणून सरकारकडून परमँगनेट आफ पोटॅश नांवाचे औषध पिण्याच्या पाण्याच्या विहिरींत टाकले गेले होते. त्यामुळें रोगराई वगैरे कांहीं झाले नाहीं. यात्रेत पोलीस बंदोबस्त योग्य होता त्यामुळें चोऱ्या मारामाऱ्या झाल्या नाहींत. एक दिवस तालुक्याचे मामलेदार साहेब उत्सवास भेट देऊन गेले. पुण्याच्या आचाऱ्यानीं सैपाक वगैरे चांगला केला होता. त्यांच्यांत आपणांस मजूर-

गोविंदराव करंवेळाकराकडून कमी मिळते अशी तक्रार आहे. त्याचा विचार पुढील साली करण्याचे ठरविले आहे. आचार्यांनीं सामानाची नासधूस होऊं दिली नाहीं. कोठीचा बंदोबस्त गोविंद पानशिवडीकर, त्र्यंका घाळेकर रामचंद्र फतेवार वगैरे मंडळीनीं चांगला ठेवला होता. उत्सवाचा भाजीपाला व चहाचे दूध वगैरे खरेदी करण्याचे काम पापालाल, नागोबा व बाबा यांनीं चांगले केले. पंक्ती वाढण्याचे काम दिगंबरराव नांदेडकर, अप्पासाहेब नारनाळीकर, नस्मतकर, तुकाराम अजंगांवकर, कोंडोपंत नांदेडकर, जगन्नाथराव बीडकर, गणपतराव बीडकर, राहतेकर, गांधी, पुरंदरे, विठ्ठलराव गवई वगैरे मंडळींनीं करून बंदोबस्त चांगला ठेवला होता. असो. कोणत्याही उत्सवांत उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका व प्रसाद पाठविण्याचे लेबल व पिशव्या पाठविण्यास जो खर्च होतो तो संस्थान कमिटीनें करावा. त्याचा बोजा उत्सव करणाऱ्या पुढाऱ्यांवर असूं नये. निमंत्रण पत्रिका पाठविणें व मागाहून प्रसाद पाठविणें ही दोन्ही कामें संस्थान कमिटीची आहेत. यांत उत्सवाच्या पुढाऱ्यांचा कांहीं संबंध नाहीं. उत्सवाकरितांच ज्या लोकांची वर्गणी येईल त्या लोकांना प्रसाद पाठविणें योग्य आहे. पण ज्याचा एक पैसाही या उत्सवाला आला नाहीं अशा लोकांना उत्सवाच्या खर्चातून प्रसाद पाठविणें हे व्यवहार दृष्टीनें बरोबर होणार नाहीं. ज्या लोकांची वर्गणी आली त्यांना प्रसाद पाठविणें भाग आहे. व तो पाठविणें उत्सवाचे पुढाऱ्यांचे काम आहे. जे लोक येथें येतात त्यांना प्रत्येकांना नारळाचा प्रसाद दिला जातो, त्यालाच पुन्हां टपालानें प्रसाद पाठविण्याचे काम नाहीं. जे येथे उत्सवाचे वेळीं हजर नाहींत व त्यांची वर्गणी आली आहे अशाच लोकांना फक्त प्रसाद पाठवावा. मी हें संस्थान कमिटीला दोन वेळां कळविले असून त्याचा विचार कमिटीनें कांहींच केला नाहीं. तो विचार येत्या गुरू पौर्णिमेच्या कमिटीच्या वेळीं व्हावा. संस्थानच्या इभ्रती करितां निमंत्रण पत्रिका प्रसाद पाठविणें असेल तर तो खर्च संस्थानने सोसला पाहिजे. जसे साईलीलेचा खर्च संस्थान सोसते तसा हाही सोसावा. तरी कमिटीस नम्र विनंती आहे कीं हा माझा रामनवमीचा अहवालाचा रिपोर्ट गुरु पौर्णिमेच्या वेळीं कमिटीपुढें मांडावा. याचा योग्यायोग्य विचार करून मग काय ठरविणे असेल ते ठरवावे.

असो. या उत्सवांत जे लोक वर्गणी देऊन जातीनें हजर राहिले व ज्यांनीं वर्गणी पाठवून उत्सवास मदत केली व ज्यांनीं अंग मेहेनतीने उत्सवास सहाय केले त्या सर्वांचे रक्षण श्री सद्‌गुरू साईमहाराज करतीलच. जमा खर्चाचा तपशीवार खर्डा मोठा आहे. त्यांत जाणून न जाणून ज्या कांही चुका झाल्या असतील त्याची माफी समर्थांनीं

करून अशीच सालोसाल या दासाच्या हातून सेवा घेत जावी. तसेच या उत्सवास ज्यानीं द्रव्यद्वारा किंवा अंगमेहनतीनें मदत केली असेल त्या त्या लोकांच्या लेंकराबाळांचे व त्यांच्या आरोग्याचे मानममरातबाचे रक्षण करून त्यांच्या संकटांचा व दुःखाचा परिहार करून सर्वस्वी कल्याण समर्थांनी करावे.

सकल संतांचा चरणरज

दासगणु

॥ श्रीशंकर ॥

# श्रीरामनवमी-उत्सव

श्रीसच्चिदानंद सद्गुरु आधुनिक संत चूडामणी श्रीसाईबाबा महाराज संस्थान शिर्डी ता॥ कोपरगांव जि॥ नगर यांच्या शके १८६१ च्या श्रीरामजयंती उत्सवाच्या जमाखर्चाची तपशीलवार यादी:—

## जमा:—

७५-०-० गोविंद सिताराम ऊर्फ आप्पा सो देशमुख मु॥ मुखेड
५१-०-० वामन कृष्ण औरंगाबादकर वरंगल
४७-१-६ मोहनाजी संभाजी मुतखेड.
११-०-० गणेश गुराप्पा नारलावार-ऊमरी
११-०-० बाबा रंगारी, उमरी
११-०-० नागोबा वंजारी उमरी
११-०-० नारायण नागोबा रंगारी ,,
११-०-० नरसिंगा रंगारी ,,
११-०-० बाबा रामचंद्र पत्तेवार, मुखेड
११-०-० गोविंद वामन कवटिकवार, मुखेड
११-०-० चिन्नय्या मुक्कावार, मुखेड
११-०-० गोविंद व्यंकटी महाजन, मुखेड
११-०-० धोंडोपंत वकील, नांदेड
११-०-० जगन्नाथराव मास्तर, बीड
११-०-० प्रभू विठोबा गंधेवार, कोळंबी
११-०-० किसनराव पाटील, पेठशिवणी
१०-०-० रघुनाथ माधव वरूडकर जांबबाग हैद्राबाद

## खर्च:—

२४८-१३-० श्री.कचरूशेट आनंदराम मारवाडी मु॥ शिर्डी यांस गहू, तांदूळ, हरभऱ्याची डाळ, तुरीची डाळ, साखऱ्या, मुरमुरे डाळ, शेंगाचे दाणे, नारळ, घासलेटडबे, कंदील वगैरे खरेदी केले ते फरदी बरहुकूम खर्च

२४८-१३-०

७५-०-० सय्यद उसमान दारूवाला आकोला यांस शोभेच्या दारूबद्दल दिले ते पावती बरहु॥ खर्च

७५-०-० गोविंद काशिनाथ करंबेळकर यास पांच दिवसांच्या स्वयंपाकाबद्दल पावती बरहु॥ दिले ते खर्च

१२९-१२-० तूपडबे खरेदी केले ते सूर्यकांत गोविंद कवटिकवार यास पावती बरहु॥ दिले ते.

## जमा

५–०–० बंकटलाल सुरजमल शेटजी, उमरी
५–०–० चिन्नप्या तांबोळी, मुखेड
५–०–० व्यंकटी माणिक घुळेकर, मुखेड
५–०–० तुकाराम गणेश कवटिकवार, मुखेड
४–०–० दत्तात्रय विठ्ठल कवटिकवार, मुखेड
४–०–० चंद्रभागाबाई, मांजरम
४–४–० गोदावरीबाई मास्तरीण, नांदेड सदरमोल्चमा
४–०–० गणपतराव कारकून, बीड
३–०–० कोंडोपंत मास्तर, नांदेड
२–०–० किसनराव अंबिल कंटवार, उमरी
२–०–० नारायण वंजारी, उमरी
२–०–० नारायण रंगारी, उमरी

---

३७१–५–६
२–०–० पुंडलीक पाटील, उमरी
३–०–० मारुती अरगुलवार, गोदमगांव
१–०–० गणपत रंगारी, उमरी
१–०–० संगमनाथ अप्पा सोमावार, उमरी
१–०–० सयाजी मुंजाप्पा खंदारकर, खंदार
१–०–० शंकर संग्राम, आतनूर
१–०–० श्रीमती राधाबाई कोलंबी
१–०–० भिमाजी गादेवार, रुई
५–०–० तांबडे तिखट हस्ते रामचंद्र पत्तेवार गव्हाण
३१–०–० रेशमी उपरणी हस्ते गोविंद वामन कवटिकवार, मुखेड

---

४६

## खर्च

३२–७–० दूध, चहा, काफी करतां घेतले ते हस्ते गोविंद वामन कवटिकवार
२१–१३–० भाजी बटाटे व मसाल्याचे सामान हस्ते पापालाल यास खर्च
९–४–६ भोजन दक्षणा खर्च
११–४–० उमाजी महादु तेली गोडेतेल बद्दल दिले ते पावती बरहु॥ खर्च
१२–१०–० विठोबा भाऊ सुतार यास सरपण लांकडाबद्दल दिले ते पावतीबरहु॥ व किरकोळ खर्च
९–३–० मजुरी गड्यांची व बायकांची दिली ती हस्ते नाना गायके खर्च
४६–१४–६ बाळा पिराजी गुरव यास मांडवाबद्दल सामान वगैरे यादी वर हुकूम दिले ते खर्च
१७–०–० तुकाराम केशव अजेगांवकर यांस अध्यात्म रामायणाबद्दल खर्च १० रुपये रोख ३ रुपये जाणयेणे ४ रु. नागपुरी उपर्णे पान १ दिले.
१९–०–० किसन आबाजी कासार रा. पाथरी यांस रामनवमी बद्दल १० रु. रोख, ५ रु जाणयेणे ४ रु. उपर्णे पान १ दिले ते खर्च

---

२०८–१–०

## जमा

दासगणू महाराजा मार्फत
आलेली रक्कम

५०–०–० श्रीमंत गिरजाबाई सो होळकर ऊर्फ बनसोडे मासाो महाराज बक्षीबाग इंदोर

११–०–० पांडुरंग नारायण

११–०–० बापुराव राघोजी बोरावके, शिर्डी

१०–०–० भास्करराव चांदोरकर सिव्हिल-सर्जन, भंडारा

१०–०–० भगवानराव बनसोडे हरसिद्दी, इंदोर

६–६–० गोपाळ रघुनाथ तळवलकर, उमरावती

६–४–० वसंतराव म्हात्रे, अंधेरी

५–४–० हरिश्चंद्र रामचंद्र मिस्त्री, अंधेरी

५–४–० शांताबाई खंडेराव नवलकर अंधेरी

५–०–० दाजी सो अवस्ती शुकवार, पुणें

५–०–० दिनानाथ गणपराव कीर्तीकर आंबेवाडी नाका, मुंबई

५–०–० कृष्णाजी वामन जोशी, नागपूर

५–०–० लक्ष्मीबाई कोल्हटकर, माटुंगा अनाथ महिलाश्रम सुपरिंटेंडंट

५–०–० श्री. गजानन गोविंद दाभोळकर सेंटमार्टीरोड वांद्रा

५–०–० मि. बी. व्ही. व्यंकट लक्ष्मी

५–०–० सय्यद हुसेन दारूवाला, आकोला

५–०–० रामचंद्र सिताराम देव ऊर्फ बाळ भटजी, अंधेरी

## खर्च

१–०–० नेवासेकर मोहनीराज बडवे यांस दिला तो खर्च (केशवराव बडव्यांस)

२०–०–० हुसेन सयदुभाई व महमद सयदुभाई यांस ब्यांड व ताशा बद्दल दिले ते खर्च १८ रु. २ रु. पावती बरहु॥

९–०–० वासुदेवराव भंडारकवठे, पंढरपूरकर यांस पांच दिवसांचा अभिषेकाबद्दल ५ रु. व जाणे-येण्याचा खर्च ४ दिले ते.

६–०–० नाशिककर गवई यांस १ रु. रोख व वस्त्र जरिचे उपर्णे ५ रु. चे दिले ते खर्च

३१–०–० श्री साईबाबाचे पालखीवाले अबदागीरवाले ताशेवाले सेवेकरी वगैरे यांस रेशमी उपर्णी दिली तो खर्च

१७–८–० गुळाच्याढेपा ५, खर्च झाल्या त्या खर्च

४–०–० नाना चोपदार यांस पाणी भरण्याबद्दल दिले ते पावती बरहु॥ खर्च

२५–०–० हनुमानजयंती बद्दल भिल्ल, वडारी, चांभार, महार व मांग या लोकांस भोजन गुळ शिरा जेवण खर्च दिला तो खर्च.

२–०–० ताराबाई बेलापुरकरीण गाणारीण हीस दिले ते खर्च.

## जमा

५-०-० धोंनाथ सीतानाथ अजिंक्य ऊर्फ धोंडोपंत डॉक्टर आंबेवाडी नाका मुंबई

२०६-२-०

५-०-० इन्स्पेक्टर बापुराव जोशी, बार्शी लोखंडगल्ली

५-०-० श्री. हरि मोरेश्वर भिडे, लोणावळा.

५-०-० श्री. गोविंद काशिनाथ गाडगीळ बॅरिस्टर सदाशिव पेठ-पुणें

५-०-० श्रीमती उमाबाई वसंत विहार, दादर

५-०-० देवराव दामोदर सामंत, दादर

५-०-० सौ. द्वारकाबाई जोशी, मालेगांवकर

३-०-० सौ. इंदिराबाई कृष्णराव पेंढारकर

३-०-० रामचंद्र बळवंत भाटे, दादर

२-०-० बाई गुंडेवार, पंढरपूर

२-०-० नागलक्ष्मी अमल, मद्रास

२-०-० बी. जी. एम पारसी, दादर-मुंबई

२-०-० आनंदराव परशराम, कांदेवाडी

२-०-० गंगाधर नारायण, बांद्रा

२-०-० वामन विठ्ठल दातार वकील, जळगांव जामोद

२-०-० वसंतराव गोरक्षकर, सांताक्रूस

१-४-० सुंदरराव नवलकर, मुंबई

१-४-० सौ. शांताबाई नवलकर ,,

१-४-० दिनकर महादेव जुवळे, दादर

## खर्च

१३-११-० पन्नालाल मारवाडी यांजकडून कमीपडलेल्या (साखऱ्या) बद्दल पावती बरहु॥ खर्च.

९-८-० गहू अप्पा शिंदे यांस गव्हाबद्दल दिले ते पावती बरहु॥ खर्च

६-०-० किरकोळ गाडी भाडे खर्च.

११-०-० बाळाजी गोविंद रासने नगरकर यांस तांदळाचें पोतेबद्दल-दिले ते खर्च.

२५-४-० आयुर्वेद विद्यालयास श्री साईबाबांच्या नांवाची शिष्यवृत्ती दरमहा २ प्रो॥ दिले ते खर्च.

५-०-० श्रीहनुमान जयंतीबद्दल खर्च १ बावाजी लक्ष्मण यांस अभिषेकाबद्दल ३ बाळा पिलाजी गुरव यांस उपरणें व दाळ हरभऱ्याची कापूर वगैरे खर्च.

१-०-० बाळाभाऊ खैरकर रामदासी यांस धर्मादाय दिला तो खर्च.

१-८-० अमोलक राजरूप यांजकडून सैपाकास खांदी घेतली तो खर्च

५-०-० श्रीरामनवमीचे उत्सवकारितां तिखटाबद्दल बाबारामचंद्र पत्ते यांस दिले ते पावती बरहु॥ खर्च

०-८-० तुकाराम बापू मांग यांस कावडी वाजवण्याबद्दल दिले ते खर्च.

४६-१०-३ बिनपावतीचा किरकोळ खर्च पत्रावळी, द्रोण, तांदूळ, डाळ हस्तें गोविंद वामन कवटिकवार

| जमा | |
|---|---|
| १-४-० | महादेव विष्णु करमरकर, दौंड |
| १-४-० | रामचंद्र श्रीनिवास जोशी, एवला |
| १-४-० | औटी मास्तर, शिर्डी |
| १-४-० | बळवंत हरी कर्णिक ,, |
| १-०-० | अनपुर्णाबाई जोशी, ठाणें |
| १-०-० | गोपाळाची आजी जानकीबाई परळीकर, पंढरपूर |
| १-०-० | राजाभाऊ साठ, पुणें |
| १-०-० | दुर्गाबाई दीक्षित, पंढरपूर |
| १-०-० | भिकाजी महिपत राणे, दादर |
| १-०-० | शिवराम वासुदेव गोखले, नांदगांव |
| १-०-० | त्रिंबक महाराज खंदारकर, ,, |
| १-०-० | श्री. जनार्दन सामंत, ,, |
| १-०-० | करोडे मास्तरची आई, पुणें |
| १-०-० | बाळाजी गोविंद रासनें, नगर |
| १-०-० | सौ. इंदिराबाई डांगे, ,, |
| १-०-० | विनायक शंकर तलाठी, ,, |
| १-०-० | रमाबाई काना, ,, |
| १-०-० | वासुदेव भटजी भंडार कवठे, पंढरपूर |
| ७२-१२-० | |
| ५-०-० | आनंदराव पाटील उर्फ काका पाटील, अंधेरी |
| १-०-० | बाबुराव तळाशीकर, पुणें |
| १-०-० | निळकंठ भाऊ गांधी, चिपळूण |

| खर्च | |
|---|---|
| ९-१४-० | उत्तमचंद पन्नालाल शेट यांज कडून खादी तागा १ (७८=) खण ८ (३॥।) गरीब लोकांस देण्याकरितां घेतले ते पावती बरहु ॥ खर्च |
| ४-०-० | सद्रे शिलाई-दर सन्यास तीन आणे २१ प्रमाणें हस्ते रंगनाथ बाळा शिंपी यास दिलें पावती बरहु ॥ खर्च |
| ५-०-० | वहिनीबाई जोगळेकर यांना हि केशराबद्दल दिले ते खर्च |
| ३-४-० | मोगलाईतील लोकांस उत्सवाचे निमंत्रण पाठविल्या तो टपाल खर्च |
| ४-०-० | वासुदेव राजाराम मिसाळ शास्त्री संगमनेरकर यास संभावने ब रु. चार दिले ते खर्च |
| ५-०-० | कुंभार कोळी न्हावी परीट सुतार इतक्यांस रामनवमी उत्सवांत काम केल्याबद्दल इनाम दिले ते खर्च |
| ३-०-० | नाना गायके यास मजुरी दिली तो खर्च |
| १-८-० | सरूबाई मोलकरीणहीला मजुरी दिली तो खर्च |

## जमा

१-०-० सौ. पार्वतीबाई सदाशिव शेवाळे, खामगांव

१-०-० सौ. लक्ष्मीबाई नारायणराव पोंडे खामगांव

१७-८-० गुळाच्या ढेपा ५ त्याचा तपशील
बोरावके २
शिवराम बोरावके २
गोंधाजी १
५

११-०-० तांदुळाचे पोतें १ बाळाजी गोविंद रासने, नगरकर

३-०-० जडाबाई शेगांव, काळा मसाला

७-०-० लक्ष्मीबाई जोगळेकर पुणें
वहिनीबाई ३ रु. हिंग ४ रु. केशर

१२-०-० कंदील विक्रीवरून रकम आली ती रुपये बारा

५९॥

श्रीधर नारायण खारकर, ठाणें चिटणीस सं. शिर्डी यांचे मार्फत त्याचा तपशील

२४८-१०-६ जमा-दोन वेळ आले से
६५ व १९३॥=॥
नांव निशीवार यादी
५ श्री. जगन्नाथराव नेलोर
१ वासुदेव पुतळाजी देसाई, ठाणें
१ का. रा. आंजलेंकर, मुंबई

## खर्च

१०१॥।४॥ खारकर सेक्रेटरी सं. शिर्डी यांच्या हस्ते झालेला खर्च
४॥। कन्हेरे
६॥ पत्रिका छपाई
३५।= पोस्टेज

४६॥-
३।-॥ पावल्या पोस्टेज
५२-१४-० प्रसाद खर्च
५॥ लेबलें
१ कापडी पिशव्या
॥। रद्दी
४ खडीसाखर
३।= पोस्टेज

६२॥।=
खर्च १०१॥।४॥ खारकर

६६-०-० हली रुपयाचा बट्टा शेंकडा सोळा आणे खर्ची घातला तो सासष्ट रुपये

६५-१०-० श्री साई महाराजांचे पेटीतील पांच दिवसांचे पैसे हस्ते तात्या गणपतराव पाटील कोते हगाम्याकडे दिले ते खर्च

२७१-०-६

जमा

॥ त्रिंबक रावजी प्रधान,
भिवंडी
५ खंडेराव अनंत जुनरकर,
बडोदे
१। शेठ के. ए. पंथकी,
सांताक्रूस
२ के. मो. पंडीत, नाशीक
१॥ त्रिंबक न. अढिया, डहाणू
१। विठ्ठल आत्माराम प्रधान,
माहीम
१ मोरेश्वर विष्णु जोशी,
उमरगांव
१ ज. पां. महाडिक, केळवे
-॥- बी. व्ही. मथुन्ना, बंगलोर
१ आर रामस्वामी ,,
२ सौ. इंदुमती वसंतराव चौबळ
कुर्ला
४ जी. ई. संपथु चेट्टी, मद्रास
५ जे. आर. दलाल, मुंबई

४३॥

श्री. ना. खारकर ठाणे यादी—

२—०—० वाय. व्यंकटराव निडाडावोल
५—०—० एस. रामचंद्र अय्यर वालापालायाम
१—०—० द. ना. गुरुजी म्हैसाणा
१—०—० कं. व. कुद्दोजकर, ठाणे
१०—०—० डॉ. के. व्ही. सावे, मुंबई
१—०—० जनाबाई सिताराम घटे, सोलापूर

जमा

५—०—० डी. के. साहूनदसे, चेंबूर
१—०—० बी. औदिसेशिया, नेलोर
१—०—० मिसेस जानकीबाई सिताराम तोंडनकर, दा[illegible]
१—०—० मि. लक्ष्मीबाई खंडेराव चोन[illegible]
बोरि[illegible]
५—०—० तुळसीदास खिमजी, कोट मुं[illegible]
४—०—० काशिबाई कानिटकर, पुणे
१—४—० जगन्नाथ हजारे, ठाणे
५—०—० ग. त्रिं. कर्णिक, कल्याण
१—०—० मा. त्रिं. कर्णिक, ,,
१—०—० ग. ना. केदारी, ,,
१—०—० अशोक प्र. प्रधान ,,
१—०—० कृष्णराव प्र. वैद्य, ,,
१—०—० शांताबाई राजे, ,,
१—०—० मनोरमाबाई वैद्य, ,,
१—४—० पांडुरंग विठ्ठल खवणेकर, कुर्ला
१—०—० सदाशिव निळकंठ रांईलकर, मुं[illegible]
१—४—० सावळाराम आर. शिरोडकर, कु[illegible]
१—४—० सौ. राधाबाई सा. शिरोड[illegible]
१—४—० आत्माराम सा., शिरोडकर, ,,
१—४—० सौ. लक्ष्मीबाई वासुदेव शिरोडकर, कु[illegible]
१—०—० गंगाधर मो. सुर्वेकर,
४—०—० वसंत नारायण चोणकर, बोरि[illegible]

जमा

१-४-० मनोरमाबाई ग. कारखानीस ठाणे
१-०-० मेरवानजी ठाणावाला, ,,
२-०-० ग. के. रेघे, भानपुरा
१-०-० रघुनाथ द. रेघे, कुडाळ
१-०-० मथुराबाई गोरे, जळगांव
२-०-० सी. एस. रामस्वामी वकील, अनंतापूर
५-०-० रामचंद्र आत्माराम दोंदे, कराची
१-०-० हरीभाऊ दळवी, केळवे माहीम
०-५-० अर्जुन बाळू पोस्टमन, ,,
०-५-० सौ. आनंदीबाई अर्जुन ,,

८०-६-०

श्री. ना. खारकर यादी

१-०-० पांडुरंग सखाराम घम, मुंबई
२-०-० डॉ. एम्. बी. गुप्ते, ठाणे
१-०-० पार्वतीबाई चोणकर, पेण
५-०-० भाऊ आबाजी वैद्य, दादर
१-४-० दत्तात्रय ग. वैद्य, ,,
१-४-० श्रीनिवास रामकृष्ण वैद्य ,,
१-४-० सावित्रीबाई मोरेश्वर सावे, मुंबई
१-०-० लक्ष्मण मोरेश्वर सावे, ,,
१-०-० सखाराम मोरेश्वर सावे, ,,
१-४-० नारायण रामचंद्र पाटणकर अलिबाग
१-४-० चंद्रकांत रामचंद्र पाटणकर, ,,
१-४-० सीताबाई रामचंद्र पाटणकर, ,,
२-०-० पुरुषोत्तम गोपाळदास घडियाळी मुंबई

जमा

१-०-० कलावंती धरमदास, पांजरपोळ मुंबई
१-०-० मणीबाई हरगोविंद, ,,
१-४-० सौ. सुशीलाबाई व. गोरक्षकर, शांताक्रुझ
१-४-० कु. सीमंतिनी व. गोरक्षकर, ,,
१-४-० कुमार सदाशिव व. गोरक्षकर, ,,
१-४-० तारा नारायण गोरक्षकर, ,,
१-४-० सौ. नऊबाई शामराव धुरंधर, पार्ले
१-४-० सोनाबाई शामराव धुरंधर, ,,
१-४-० दोराबजी धनजीशा ताडीवाला, मुंबई
१-४-० रामराव दि. मदन, ,,
१-४-० शेट बाबामिया, वांद्रे
१-०-० विष्णु हरी दातार, ठाणे
१-०-० सौ. रमाबाई नरहर येरवडेकर, दादर
०-१०-३ सौ. गुलाबबाई केशव भोईर, ठाणे
०-८-० दिनशा वाडिया, मुंबई
१-०-० गो. मा. दातार, ठाणे
२-०-० आ. प. डोळस, कांदिवली
१-०-० य. शा. दिघे, ,,
१-४-० सोनाबाई ल. नाडकर, माहीम
१-०-० पी. आर. काकडे, अमळनेर
५-०-० एल. पी. उपल्प, सोलापूर

जमा

५–०–० आनंदराव मा. पौडवाल, मुंबई
१–०–० के. एस. मनी, कोइमतूर
१–०–० गा. वि. मोडक, दादर
५–०–० बाळकृष्ण पुरुषोत्तम, ,,
२–०–० कमळाबाई पुरुषोत्तम ताठरे, दादर
२–०–० बी. जगन्नाथ, अनंतापूर

६८–२–३

श्री. ना. खारकर यादी

०–०–४ एन. आर. जोशी, सोलापूर
१–०–० एस. व्ही. कडेकर, ,,
१–०–० शंकरराव पाटील, नवघर
१–४–० जी. ए. मुळे, माहीम
१–४–० एस. एम. समेळ, ,,
२–०–० पुरुषोत्तम आ. राजाध्यक्ष, मुंबई
१–०–० विष्णु गो. देव, संगमनेर
५–०–० गा. वि. वाड, भुसावळ
३–०–० द. शि. ओक, नाशीक
१–४–० रा. सा. काशीराम भागोजी केळसकर, ठाणे
२–०–० मा. वि. करंडे, मुंबई
५–०–० बाई सरस्वती गणपतराव, मुंबई
३–०–० माधवराव पांडुरंग, ,,
१–०–० गोवर्धन मा. विजयकर, ,,
१–०–० गंगाबाई मा. विजयकर, ,,
५–०–० कोना आदिनारायण वर्मा, कृष्णपुरम्
१–४–० कृष्णराव रा. खंडकर, देवास

जमा

१–०–० रावजी वा. उपासनी, धुळे
०–८–० एम्. नारायण थंपी, त्रावणकोर
१०–०– जे. बी. कोठारी, इंदोर
२–०–० ना. वा. गुणाजी, बेळगांव
१–०–० चिं. रा. तळवलकर, सातारा
५–०–० ए. आर. मुल्की, कलकत्ता
१–०–० व्ही. के. संत, शिरापुर
०–१०–३ सौ. गु. के. भोईर, ठाणे

५६–६–३

एकूण खारकर २४८–१०–६

७५–१२–९ रामचंद्र रामकृष्ण सामंत खजीनदार, वांद्रे यांजकडून आलेली जमा–

२–०–० राव सो. ए. ज. गाळवणकर, अनोळ
२–०–० रमानाथराव के. शिवाड, टर्नर रोड वांद्रे
५–०–० मोरेश्वर नारायण सावे, नावलकर
१–०–० वासुदेव बापूजी आकूत, वकील नाशिक
१–१०–० शामराव भास्कर केळकर, बी, ३६, खटाव बंगला मुंबई
१–०–० आर. बी. मयेकर, लंडन फि[illegible] मुंबई
५–०–० दाजी विठ्ठल सांबारे, तेजपाळरो[illegible] विलेपार्ले–मुंबई नं. २[illegible]
१–४–० एम्. एस्. जयकर, हनुमान बिल्डिंग लॅमिंग्टनरोड मुंबई नं.[illegible]

१८–१४–०

| जमा | जमा |
|---|---|

**रा. रा. सामंत खजिनदार यादी चालू**

१-४-० नारायण धोंडू परुळेकर, पोष्ट ठाणें विरार
१-०-० ज. रा. दळवी, जि. ठाणे, वसई
१-०-० सौ. सीताबाई राजाराम वालावलकर, श्री. बिल्डिंग रानडेरोड मुंबई नं. १४
१-४-० चिंतामण रामनाथ सातघरे २९२ बझाररोड मुंबई नं. २०
५-०-० प्रभाकर दौलतराव मंत्री, १६ खोताची वाडी मुंबई
५-०-० डॉ. छोटालाल भूलभाई भट्ट, जि. खेडा- मेमदाबाद
१-०-० अनंत धोंडदेव खानोलकर, अर्नाळा जि. ठाणे
०-४-० चिंतामणी आनंदराव चितळे, रंगारी ब्लाकस मुंबई नं. २०
२-०-० बळवंत विठ्ठल वाघ, ( मातोश्रीकडून ) १४ रस्ता मुंबई नं. २१
२-४-० विनायक अप्पाजी वैद्य, अंधेरी
०-४-३ साईनाथवी वैद्य, ,,
०-४-३ अनंत वी. वैद्य, ,,
१-४-० दत्ताराम आनंदराव पितळे, ८९ पारेख हाऊस कोळ्याची वाडी फणस वाडी मुंबई
०-५-३ सौ. सुलोचना द. पितळे, मुंबई नं. २
०-५-३ विजयकुमार द. पितळे, ,,
०-५-३ सुनंदा पितळे, ,,
०-५-३ चि. कमळाकर केशरीनाथ कोटकर मुंबई नं. ४
०-५-३ मालिनी केशरीनाथ कोटकर, ,,
१-०-० डॉ. दिनकर जगन्नाथ गाळवणकर, ठाणे
०-८-० शंकर नारायण पाटणकर, मुंबई
०-४-० गोविंद शिवराम कारखाननीस, ११ रस्ता मुंबई
०-४-० वामन शिवराम कारखाननीस, ,,
२-०-० बाळकृष्ण वामन वैद्य, वांद्रे
१-४-० कमळाबाई पाटणकर, घोडबंदर रोड
१०-०-० रंगनाथ नारायण गल्हाणकर, पोष्ट वसई-ठाणे
२-०-० वासुदेव गोविंद कानीटकर, अहमदनगर
५-०-० वा. मा. मानकर व सोनाबाई, जयकर जरम्यानखान बांद्रे
२-०-० बी. एस. सुब्रम्हण्यम्, श्रीनिवासपुरम् पो. कोईमतूर
१-०-० गजानन श्रीधर पिटकर, पोर्ट्रस्ट ऑफिसर. बॅलार्डरोड मुंबई
१-४-० हरी गोपाळ सकपाळ, खार मुं
५-०-० वासुदेव गणेश कोनकर, वजिरीवझिरीया पो. चांचोद बडोदा

## जमा

२–०–० सौ. सिताबाई रामचंद्र सामंत, ४५ टर्नररोड वांद्रा

५९–१४–३

खजिनदार एकूण ७५–१२–९

११–४–० बाळा पिलाजी गुरव, शिर्डी याचे हस्तें आले ते जमा–

१–४–० प्रभाकर शिवराम पाटणकर, कोपरगांव

१०–०–० एच. संभय्या, त्रिचनापल्ली

११–४–०

५–८–० श्री. बाळा साहेब देव मामलेदार यांचे मार्फत आले ते जमा

५–०–० वासुदेव महादेव, कोलंगडे प. व. इन्स्पेक्टर, जुन्नरदेव स्टेशन जी. आय' पी. रेल्वे

०–४–० पार्वतीबाई ओझरकर, भाजे पो. मळवली ता० मावळ, पुणे

०–४–० पार्वतीबाई शिवराम कुंटे, ठाणे

१६–१२–०

६५–१०–० श्री साईबाबांच्या पेटींत पांच दिवसांचे आले ते जमा

८२–६–०

१११६–८–९ एकूण जमा अकराशें सोळा रुपये पावणे नऊ आणे असत.

१०३–२–० ह. प. सं. रत्न दासगणू महाराज यांचेकडून खर्चाचे पूर्ततेकरितां उसने घेतले ते जमा.

१२१९–१०–९

## जमा

एकूण बाराशें एकोणीस रुपये पावणे अकरा आणे असत.

१०५०–१४–९ एकूण जमा रकमेचा नांववार तपशील येणें प्रमाणें.

४१७–५–६ ह. प. दासगणू महाराज. यांचे कडून हली शिक्का रुपये आले ते

२९२–६–० सुरती रुपये आले

७०९–११–६

२४८–१०–६ श्री. ना. खारकर यांजकडून आले ते

७५–१२–९ श्री. सामंत यांचेकडून आले ते

११–४–० बाळा पिलाजी गुरव यांचे कडून आले

५–८–० श्री. बाळासाहेब देव यांचे कडून

१०५०–१४–९

## पुरवणी जमाखर्च

| जमा | खर्च |
|---|---|
| ११९६-८-९ एकूण मागील जमा रकम | १२१९-१०-९ एकूण मागील खर्च रकम |
| २५ मुसलमान लोकांनीं सिधा नेला नाहीं ती खर्च पडलेली रकम परत जमा | |
| १ शिलईबद्दल जास्त गेलेले परत जमा | |
| ९-११-३ कलतान विकून रकम आली. | |
| ५-०-० वासे विकी आली ती जमा. | |
| ११५७-४-० | |
| ६२-६-९ ह. प. दासगणू यांचे कडून खर्चाचे पूर्ततेकरितां म्हणून उसनवार जमा. | |
| १२१९-१०-९ | |

. ६।४।३९ नंतर चिटणीस श्री. खारकर यांचेकडे आलेला वसूलः—

| जमा | खर्च |
|---|---|
| १२-८-० तिसरून जमा आले ते | १२-८-० श्री. दासगणू महाराज यांचे नांवें मनीआरडरनें पाठविले. ता. ४।५।३९ |
| १-०-० श्री. शंकर केरोबा शेलार, रेवदंडा | |
| १-४-० ,, ना. बा. पोरे, चेऊल | |
| ०-१२-० ,, सुं. बा. शेलार, रेवदंडा | |
| ०-८-० ,, शां. श. कर्णिक, ठाणें | |
| २-०-० ,, सी. रंगराव, मद्रास | |
| १-०-० ,, एस. लक्ष्मीकांथम्मा, मद्रास | |
| १-०-० ,, बी. ही. स्वार, मुंबई | |
| ५-०-० ,, बा. ना. दातार, बेळगांव | |
| १२-८-० | १२-८-० |

## ता. ३०।३।२९ व नंतर श्री. सामंतकडे आलेले

५–०–० सौ. बी. व्ही. वेंकटलक्ष्मीअम्मल, मद्रास
२–०–० सौ. नागलक्ष्मी विश्वनाथम ,,
२–०–० डी. एम. राजा, ,,
१–०–० सरदार एस. सी. मुदलीयार पुणे
१–०–० श्री. ए. जी. तळपदे, वांद्रे
२–४–० ,, एम. जी. कोरान्ने, बिलिमोर
१–०–० ,, शं. प. सामंत, भाईंदर
०–४–० ,, ल. बा. सोनटक्के मुंबई

१४–८–० एकूण साडे चौदा रुपये
बाकी पोटीं वसूल धरले ५–८–०
रोख दिले, ९–०–०

१४–८–०

११८४–४–० एकूण जमा
३५–६–९ ह. प. दासगणू यांचेकडून खर्चाचे पूर्ततेकरतां उसनवार

१२१९–१०–९

१२१९–१०–९ एकूण खर्च.

# शिर्डी–वृत्त

## माहे मार्च सन १९४०

### देणग्या

श्री. विश्वनाथ श्रेष्टी मद्रास यानीं ९६ भार चांदीची घंटा श्रीस अर्पण केली.

श्री आनंदराव गणपतराव किर्तीकर समर्थनिवास ११ वा रस्ता खार. ( मुंबई ) यानीं श्रीचरणीं भगव्या रंगाचा हिरवी किनारपट्टी ( वायाळ ) गलेफ अर्पण केला. एका भक्ताकडून शुभ्रकाठी उपरणे अर्पण. श्री. भि. न. वासुदेव लासूर नि. स्टे. एकवार पिवळे कापड. दोन डोळे ( चांदीचे बारीक ) श्री. वजिरबी शिर्डी.

### धर्मकृत्ये

श्री. गाडगीळ c/o श्री. दादाजी गोपीनाथ जोशी दादर. श्रीस लघुरुद्र केला.

श्री. टी. वराहलू कोईमतुर यानीं ( अप्पाला नरसिंहश्वर ) या नांवानी श्रीस लघुरुद्र केला.

श्री. रा. सा. सी. सुबीया चेट्टी नेल्लोर यानीं श्रीस लघुरुद्र केला.

श्री. नारायणराव रामराव वर्दे व महादेव रामचंद्र पुराणीक या दोघांनी मिळून श्रीस लघुरुद्र केला.

श्री. माधवराव सहस्रबुद्धे इंजिनीयर फलटन शुगर वर्क्स श्रीस नैवेद्य ब्राह्मण सुवाशिण भोजन व अभिषेक केला हस्ते नानू पूजारी.

श्री. के. पालनिअंद्दि पिलाई मद्रास अभिषक. श्री. सुंदरावती अभिषेक. श्री व्ही. बी. कुपुस्वामी इरोड अभिषेक. श्री. एस. माल्ली करजुनिया बंगलोर अभिषेक. श्री. टी. सी. कृष्णमुर्ती मद्रास दर रविवारी अभिषेक एक असे पांच अभिषेक केले. श्री. कृष्णाबाई C/o नारायणराव यु. बी. न्यू दिल्ली प्रत्येक गुरुवारी असें चार अभिषेक केले. श्री. बी. रामण्णा बंगलोर अभिषेक. श्री. डी. आर नायडू बंगलोर अभिषेक. मि. डि. आर. जे नायडू मदुरा अभिषेक. श्री. चक्रवर्ती अय्यर. नेल्लोर अभिषेक. श्री. पालने गोपाल कृष्णप्पा कडप्पा अभिषेक. श्री. सी. एस. नंजुनडिया बंगलोर अभिषेक

श्री. नारायण काशिनाथ देशपांडे विलेपारले अभिषेक. श्री. एम. कृष्णराव चितळदुग अभिषेक. श्री. के. एस. रामस्वामी मद्रास अभिषेक. श्री. विश्वनाथ श्रेष्टी मद्रास श्रीस अर्चन अभिषेक व पन्नास पात्र गरीबास [ अन्नदान ] केले. श्री. जानकीराम नायगार मद्रास श्रीस अभिषेक. श्री. बी. ए. सुब्रमनिया अतुर अभिषेक. श्री. एम. माल्लीरेड्डी अनंतापूर अभिषेक. श्री. व्ही. वेंकट नारायण कडप्पा कलमपुरम अभिषेक. श्री. जनपती वेंकटसुबा अय्यर श्रीस अभिषेक. श्री. विष्णुभट्ट कृष्णमुर्ती अभिषेक. श्री. डॉ. एस. रामकृष्णन् चिकबालापूर अभिषेक. श्री. सी. जानकी अभिषेक. श्री. डी. व्ही हनुमंत मुर्ति अभिषेक श्री. टी ए. पिलाई अभिषेक. श्री. जी. कोटय्या दाचपाले दोन विष्णु अर्चने केली. श्री. एन ननजुढिया माधवगिरी श्रीस विष्णूअर्चन केले. श्री. सरावण पिलाई विष्णूअर्चन केले. श्री. एन. राम गोपाळराव अर्चन. श्री. आनंदराव गणपतराव किर्तीकर समर्थ निवास ११ बा रस्ता खार श्रीस अभिषेक पांच ब्राम्हण पांच सुवाशिणी भोजन नैवेद्य श्रीस असें धर्मकृत्य केले हस्ते नानू पूजारी.

## कीर्तनें

सं. गवई बुवांची माहे मार्च या महिन्यांत एकंदर सहा कीर्तनें श्री मंदिरांत झाली. (१) श्री. रामदास नवमी ता. २।३।४० (२) महाशिवरात्र ता. ७।३।४० (३) माघवद्य ११ व (४) फा० शु० ११ श्री तुकाराम महाराज बीज (५) ता. २५।३।४० श्री एकनाथ षष्टी (६) ता. २९।३।४०

## नवल विशेष

ता. ३।३।४० रविवार रोजी श्री. बी. व्ही नरसिंह स्वामी मद्रास हे शिर्डी मुकामी एकाएकी बरेच आजारी झालेमुळें श्रींचे आज्ञेनुसार अगदी तातडीनें आपले गांवीं मद्रासकडे निघून गेले.

महाशिवरात्र ता. ७।३।४० व रंगपंचमी या दोन दिवशीं श्रींच्या पालखीची व रथाची मिरवणूक झाली. रंगपंचमीस रंग सोहळा उत्तम झाला.

## हवापाणी

उत्तम आहे.

आपला नम्र
**श्री. ना. खारकर**
ऑ. चिटणीस

# माहे एप्रील सन १९४०

## श्रीस देणग्या

श्री. सौ. कृष्णाबाई शंकरवाणी अहमदनगर बनारसी कद जरीकाठ रंग गुलाबी अर्पण. श्री. (क्ष) मुंबई शेला बनारसी रंग ( पिरोजी ) जरीकाठ अर्पण. श्री. (क्ष)

मुंबई शेला (तांबडा) जरीकाठ अर्पण. श्री. एम्. व्ही. मुदलीयार त्रिचनापल्ली यांनी निळा शेला एक जांभळा शेला एक भगव्या रंगाचा कद व दोन कलाबुताचे हार अर्पण. श्री. भाऊ आबाजी वैद्य दादर पोपटी रंगाचा शेला (वायाल) पिवळेकाठ अर्पण. श्री. हुळगे मु. राहता. जि. नगर साधे शुभ्रकाठी उपरणे अर्पण. श्री. कौसल्याबाई मु. बेलापुर. गलेफ (रंग पिवळा) साधा सुती अर्पण. श्री. जैतनबाई दिंडोरी. जि. नाशिक गलेफ (हिरवा) शाटींग पिवळी किनार अर्पण, श्री. खान गुलमहंमद पठाण सासवड गलेफ (हिरवा) शाटींग तांबडी किनार अर्पण. श्री. एकनाथ प्रल्हाद सुगावकर सोलापूर. जरीकाठी तांबडा रुमाल अर्पण. श्री. वझिरभाई शिर्डी. गलेफ (केशरी) शाटींग किनार हिरवी अर्पण. श्री. बालकृष्ण गोविंद पंडित न्याहाल पेठ पुणे उपरणे साधे अर्पण. श्री. डॉ. के. बी. गाळवणकर मुंबई शाल (हिरवी) साधी अर्पण. श्री. यमाजी जगताप इंदूर उपरणें साधे अर्पण. श्री. पुनमचंद गोटीराम मारवाडी दिंडोरी उपरणे जरीकाठी अर्पण. श्री. चांदभाई शेख महंमद भोजापूर ता. संगमनेर गलेफ (पोपटी) (वायाल) अर्पण. श्री. सिताराम बाळाजी कल्लापुरी खंडाळे कापड सुती (रंग तांबडा) हात ५ अर्पण. श्री. सोनूबाई भ्र. सोपान शिंदे गलेफ (हिरवा) शाटींग जरीची फीत लावलेला अर्पण. श्री. सावळाराम नामदेव रासने यांचे पुत्र दामोदर सावळाराम रासने अनगरकर यांनी तांदुळाची २ पोती अर्पण केली. श्री. बाळाजी गोविंद रासने अनगर यांनी तांदुळ पोते नग १. श्री. गणपत रामकृष्ण बोर्लीकर ठि. काळबादेवी मुंबई यांचेकडून तांदुळ पोते नग १ असें श्रींचें नित्यनैवेद्याकरितां सालाबादप्रमाणें आलें असे.

श्री. शंकराचा फोटो अर्पण श्री. तान्हीबाई गोसावी, शिर्डी.

श्री. टेंबे स्वामींचा फोटो श्री. लक्ष्मणबुवा गाडगीळ शिर्डी यांनी अर्पण केला.

श्री. साईबाबा या अक्षरांची भरतकामाची व त्यांत बाबांचे लॉकेट साइजचे फोटो असलेली फ्रेम कु. इंदुमती श्रीधर खारकर यांजकडून अर्पण.

## धर्मकृत्यें

श्री. पी. एस. अनंत नारायण त्रिचनापल्ली अभिषेक. सौ. कामाक्षी अम्मल अभिषेक. श्री. राममुर्ति अभिषेक. श्री. बी. तिरुमलाचार्य म्हैसूर अभिषेक. श्री. टी. व्ही. पिलाई मद्रास अभिषेक. श्री. के. नरसिंहमूर्ति अभिषेक. श्री. एम. सुब्बाराव अभिषेक. श्री. चंदुलाल साखरलाल अभिषेक. श्री. गोपाळकृष्ण अर्चन. श्री. एस. ए. यज्ञनारायण अभिषेक. श्री. ए. नरसिंगराव बेल्लारी अभिषेक. श्री. कृष्णचंद्र आणि कं. अभिषेक. श्री. एन. आर. सारंगपाणी मदुरा अर्चन अभिषेक. श्री. टी. एन. पेरुमल कोईमतूर

अभिषेक. श्री. बानम्मा C/o बी. नारायणराव अनंतापुर अभिषेक. श्री. सी. व्ही. रम-
णय्या चेटी नेल्लोर अभिषेक. श्री. एन. हणमंतराव अभिषेक. श्री. बी. एस. व्यंकट-
रमण मद्रास अर्चन अभिषेक. श्री. एन. सुंदरसन तिरुप्पारमकुमरम अभिषेक. श्री. एस.
जयलक्ष्मी अर्चन व अभिषेक. श्री. एस. रामचंद्र अय्यर अर्चन व अभिषेक. मि. श्रीरंग
मद्रास अभिषेक. श्री. टी. वराहलू अर्चन व अभिषेक. श्री. ( क्ष ) अर्चन व अभिषेक.
श्री. एन. रामस्वामी नायडू अभिषक श्री. के. पालनिअंदि पिलाई मद्रास अभिषेक. श्री.
वैद्यनाथ अय्यर अभिषेक. श्री. पी. एन. जी. नायडू अभिषेक. श्री. सुब्बा लक्ष्मी मदुरा
अर्चन. श्रीमंत वहिनीसाहेब अभिषेक नैवेद्य. ब्राह्मण सुवाशिण भोजन. श्री. कृष्णस्वामी
मद्रास अभिषेक. श्री. के. एस. मनी कोइमतुर अभिषेक. श्री टी. व्ही. एस. नायडू
मद्रास अभिषेक. श्री. सी. राजु सुंदरम्मा अभिषेक. श्री. अंडरकी अभिषक श्री. कामाक्षी
अम्मा अभिषेक. श्री. टी. एस. लिंगम अर्चन. श्री. डॉ. एस. रामकृष्णन अर्चन अभि-
षेक. श्री. जयरामान् मैलापूर. अभिषेक. श्री. बी. सरस्वतीबाई अभिषेक. श्री. श्रीपती-
राव वकील गुंटी अभिषेक.

श्री. संकरस्वामी मद्रास अभिषेक. श्री. सी. व्ही. सुब्रह्मण्यम नेल्लोर अभिषेक.
श्री. जनार्दन ह. काळकुंद्रीकर बेळगांव अभिषेक श्री. टी. डोरास्वामी पिलाई अभिषेक.
श्री. बासीरड्डी रामलु अभिषेक. श्री. कृष्णस्वामी मद्रास अभिषेक. श्री. रामनाथ अय्यर
अभिषेक. श्री. कृष्णाबाई C/o नारायणराव न्यू दिल्ली दर गुरुवारी अभिषेक केला.
श्री. प्रधान अभिषेक.

## कीर्तन

संस्थान गवईचें फा. व. ११ स कीर्तन झाले.

## नवलविशेष

ता. २४।४।४० बुधवार रोजीं श्री साईबाबांचे जुने भक्त श्री. माधवराव बळवंत
देशपांडे श्री साईचरणीं विलीन झाले.

श्री रामनवमीचे उत्सवाचा अहवाल (निराळा) स्वतंत्र येत असल्यामुळें त्याचा
यांत उल्लेख नाहीं.

गुडीपाडव्याचे दिवशी श्रीस पंचामृतस्नान ध्वज आरोहण. रात्रौ रथाची
मिरवणूक झाली.

## हवापाणी

उत्तम आहे.

श्री. ना. खारकर
ऑ. चिटणीस.

## माहे मे सन १९४०

### देणग्या.

श्री. शंकरराव कोल्हजकर ठाणे, धोतर जोडी अर्पण. श्री. नरहर अनंत पिटके हेडमास्तर म. शाळा शिर्डी. गुलाबी कापड ( वायाळ ) वार २ अर्पण. श्री. ए. श्रीकंठा-अय्यर वकीलमार्फत सौ. विशालाक्षी यांचे नांवे चांदीची समई भार १७॥ अर्पण. श्री. भिवराव देवराव उमरावती, जरीकांठी उपरणे अर्पण. श्री. माधवराव जी. लिमये, मनमाड यानी श्री. बाबांचा प्लॅस्टरचा पुतळा कांच बसविलेला अर्पण. हस्ते श्री. वसंत-राव गोरक्षकर.

### धर्मकृत्यें

अभिषेक—श्री. रावसाहेब डोडीया शिर्डी, श्री. रमेश गजानन कर्णिक. श्री. सौ. सुधा कर्णिक कल्याण, श्री. प्रभाकर केशव प्रधान, श्री. कृष्णाजी विष्णु गणपुले, श्री. रामचंद्र त्र्यंबक जोशी, श्री. यशवंत गणेश नाईक, श्री. भाई दुर्लभ चवधारी, श्री. एस. नरसिंह, श्री. एस. अलसिंगाचारी, श्री. तिरुनारायण, श्री. सरस्वती विठ्ठल प्रभाकरराव राजमहेंद्री, श्री. पी. ए. कृष्णस्वामी कोईमतुर, श्री. जानकी, श्री. पुन्नमल रंगून, श्री. वासिरेड्डी सूर्यनारायण अर्पण. श्री. प्रसादमपती भद्राजीराम्मा मद्रास. श्री. रापुर विभिय वेल्लोर, श्री. एस. आर. चेट्टी पोर्टसैद. श्री. राजूशेषगिरी. श्री. टी. सी. कृष्णमूर्ति, मद्रास. श्री. के. सत्यनारायणराव वकील. मार्कापूर. श्री. पी. ओ. नाथराजा गोणुदास मुक्कानाईकनपल्म्. श्री. के. पी. पिलाई मद्रास. श्री. एम्. माल्लि रेड्डी अनंतापूर. श्री. श्री. डब्ल्यु एस. कारखानीस खार. श्री. ए. रामनाथ आय्यर मद्रास. श्री. सी. व्ही. कृष्णराव नायडू कोकोनाडा. श्री. सी. एम. वेणुगोपाळ पुणे. श्री. टी. एस. लिंगम पोर्ट-ब्लेअर. श्री. सी. आर. के. मुर्ती कोइमतुर. श्री. चंद्रकांत वा. मालवणकर, कराची. श्री. व्ही. बी. कुपुस्वामी इरोड. श्री. वरदराजा चेट्टीयर. श्री. वेणुस्वामी पिलाई. श्री. कृष्णमुर्ती मद्रास. श्री. कामाक्षी अम्मल पर्वतवरदानी कोईमतुर. श्री. एम. जी. नाथम् कटक. श्री. सौ. शकुंतला मद्रास. श्री. के. एस. मनी कोईमतुर. श्री. सी. जी. राजा वेल्लोर. श्री. टी. सी. कृष्णस्वामी मद्रास. श्री. एस. विश्वनाथअय्यर मद्रास. डॉ. जी. सुब्रह्मण्यम् वेल्लोर. श्री. ए. एल. नरसिंगराव. श्री. वेंकटनारायण. श्री. एम. ए. वेदवल्ली अम्मल. श्री. एम. ए. रुक्मिअम्मा. श्री. एल. रामनाथचेट्टी त्रिचनापल्ली. श्री. गणेश पिलाई मद्रास. श्री. टी. सी. कृष्णमुर्ती मद्रास. श्री. अनंत धोंडदेव सानोलकर नाशीक. अभिषेक व अर्चन—श्री. बी. व्ही. राजगोपाळ बंगलोर. श्री. ए. राघवैय्या मद्रास. श्री. एम. माली रेड्डी, श्री. व्ही. सांबशिवन. श्री. मिस कृष्णाबाई न्युदिल्ली दरगुरुवारी.

डॉ. सुमंतराव मानेंबुणें. बाबुराव आसन. श्री. शंकरराव शिंदे मुंबई. श्री. शंकरराव वाणी सौ. कृष्णाबाई नगर. श्री. त्र्यंबकराव खळे मुंबई श्री. गणेश अनंत कोनकर, ठाणे. श्री. मधुसूदन गो. प्रधान मुंबई. श्री. श्रीधर नारायण ऊर्फ नानासाहेब खारकर ठाणें.

## नवलविशेष.

श्रीमंत रा. ब. भाऊसाहेब धुमाळ यांचे पुतणे श्री. सदाशिवराव यांचा विवाह ता. २३-५-४० गुरुवार रोजी मालेगांवचे सराफ श्री. अनंतराव श्रीकृष्ण कापसे यांची कन्या सौ. कां. शकुंतला इचेशीं श्रीक्षेत्र शिरडी येथें श्रीसाईबाबांचें चरणापाशीं श्रीमंदिरांत मोठ्या थाटानें झाला. लग्नाप्रित्यर्थ श्रीस पंचामृत स्नान महानैवेद्य ब्राम्हण सुवाशिणी भोजन श्रीबाबांचे भक्तमंडळी सेवेकरी गावकरी वगैरे अवध्यांस तीन दिवस पक्वान्नाचें भोजन दिलें. लग्नसमारंभाप्रित्यर्थ बाहेरगांवचे पाहुणे मंडळी नाशिक, मालेगांव, पुणें, मुंबई, सोलापूर. श्रीमंत भाऊसाहेबांची आप्तइष्टस्नेही मंडळी बरीच आली होती.

श्री. नरहर अनंत पिटके हेडमास्तर मराठी शाळा शिर्डी यानीं आपल्या चि. प्रभाकर व चि. मधुकर या दोन मुलांचा व्रतबंध श्रीबाबांच्या गुरुरायाच्या समाधीपाशीं श्री. के. नवलकर वाड्यांत थाटांत वै. शु. २ व वै. शु. ५ या दिवशीं केला. तसेंच त्यांची कन्या सौ. कां. विमलबाई इचा विवाहहि वै. शु. ८ रोजीं श्री. तुळशीदासपंत जोशी कान्हूरकर यांच्याशीं झाला. त्याप्रित्यर्थ श्रीस महानैवेद्य महावस्त्र ब्राम्हणभोजन सुवाशिण भोजन संस्थानच्या सर्व नोकर व सेवेकरी वगैरे सर्वांस व गावांतलि सर्व पाटील मंडळीस तीन चार दिवस पक्वान्नाचें भोजन दिलें.

श्रीमंत श्रीधर नारायण ऊर्फ नानासाहेब खारकर संस्थानचे ऑ. चिटणीससाहेब यानीं आपली कन्या सौ. कां. चि. इंदूबाई इचे विवाहाप्रित्यर्थ श्रीस अभिषेक, महानैवेद्य ब्राम्हण सुवाशिनी भोजन, संस्थानचे सर्व नोकर, सेवेकरी, बाहेरील भक्तमंडळी व गावांतील प्रमुख मंडळी असे ५०।६० मंडळीस पक्वान्नाचें भोजन देऊन संतुष्ट केलें.

श्री. नाथोबा आसने शिर्डी यानीं आपले मुलाचे लग्नाप्रित्यर्थ श्रीस एक दिवस अभिषेक, नैवेद्य ब्राम्हण भोजन, व गावांतील सर्व पाटील मंडळी, संस्थानची नोकर व सेवेकरी मंडळीस शिरा कढीभाताचें भोजन श्रीमंदिरांत दिलें.

## कीर्तनें

या महिन्यांत श्रीपरशुरामजयंती. श्रीनरसिंहजयंती व दोन एकादशी अशीं चार कीर्तनें संस्थान गवई यांची झालीं. एक दिवस ह. भ. प. विश्रामबुवांचे शिष्य व श्री. हुसेन या दोघांचें मिळून तासतासभर निरुपण कीर्तन झालें.

## हवापाणी.

उत्तम आहे.

श्री. ना. खारकर. ऑ, चिटणीस.

श्रीशंकर.



## श्री सद्गुरु साईबाबा.

श्री सच्चिदानंद सद्गुरु आधुनिक संतचूडामणि श्री साईबाबा महाराज संस्थान शिर्डी ता. कोपरगांव, जि. अहमदनगर यांचा सालाबाद प्रमाणें श्रीगुरुपौर्णिमा उत्सव आषाढ शु॥ १५ शके १८६२ शुक्रवार ता. १९ जुलै १९४० रोजी श्री क्षेत्र शिर्डी येथें महाराजांच्या मंदीरांत होणार आहे. तरी या समयीं आपण कृपाकरून आपल्या कुटुंबांतील बालगोपाळांसह व मित्रमंडळीसह श्रीच्या तीर्थप्रसादास अवश्य यावें अशी नम्र विनंती आहे.

## उत्सवाचा कार्यक्रम

ता. १८ जुलै, आषाढ शु. १४ गुरुवार–नियमित कार्यक्रमाव्यतिरिक्त दोनप्रहरीं कीर्तन व रात्रौ रथ.

,, १९ ,, ,, ,, १५ शुक्रवार–प्रातःकाळीं अभिषेक. नंतर श्रीचे समाधीस मंगलस्नान, पूजा, आरती व प्रसाद भोजन. सायंकाळीं कीर्तन व रात्रौ पालखीची मिरवणुक.

,, २० ,, ,, व॥ १ शनिवार–सकाळीं श्रीची पूजा, गोपालकाला व तीर्थप्रसाद.

श्री साईबाबा शिर्डी संस्थान कमिटी मार्फत.

आपला नम्र,

शिर्डी.
ता. २७ जून १९४०.

सेवेशीं साईदास
केशव गोपाळ बुटी.

सूचनाः—जरुरीप्रमाणें कार्यक्रमांत फेरफार करणेंत येईल.

वर्गण्या श्रीमंत बूटी अगर संस्थानचे चिटणीस व खजिनदार यांचेकडे देऊन पावत्या घेणें.

# ANNOUNCEMENT.

Shri Guru Paurnima (Ashadha Shudha 15) Utsava for the shake year 1862 of Shri Sadguru Sai Baba will as usual be celebrated at His shrine at Shirdi, Taluka Kopergaon, Dt. Ahmednagar, by his devotee Shrimant Buti, the well known millionaire of Nagpur, (C. P.), on behalf of the Shirdi Sansthan Committee. All devotees of Sai Baba are invited to attend and partake in the celebrations which will commence from Thursday the 18th and terminate on Saturday the 20th of July 1940.

Contributions should be made through either Shrimant Buti or Hon. Secy. and Treasurer of the Sansthan and receipts obtained.

**S. N. Kharkar,**
*Hon. Secretary,*
*Shri Sai Baba Shirdi Sansthan.*

# अनुभव

## अनुभव १ ला

माझे नांव भाऊ ऊर्फ आप्पा बाळाजी सुतार, राहाणार शिरडी. माझी स्थिती पूर्वी फार गरीबीची होती. माझे वडील बाळाजी सुतार व आई राधाबाई ह्यांना आम्ही एकंदर आठ अपत्यें होतों. त्या सर्वांना खायला एकटा म्हातारा कमावून घालीत असे. त्यामुळें खाणार पुष्कळ व कमावणार एकटा म्हातारा. त्यामुळें गरीबी फार. पुढें माझे वडील साईबाबाकडे जाऊं लागले. परंतु साईबाबांनी त्यांना कधीं मशीदीची पायरी चढूं दिली नाहीं. महाराज त्यांना म्हणत कीं, आपल्या पोरांबाळांना सांभाळ. इकडे तिकडे भटकत फिरूं नको. मुलेंबाळें उपवासी मरतील. अल्ला मालीक सांभाळतील. फिकीर मत करना. असें म्हणून बाबांनीं त्यांना तसेंच परत लावीत. कधीं पैसाअडका दिला नाहीं. पुढें साईबाबा समाधिस्थ झाल्यावर माझे वडील पांच वर्षांनी वारले. पुढें कांहीं दिवस मी शेळ्या व लक्ष्मण ब्राह्मण रत्नपारखी यांच्या गाई वळल्या. पुढें मी साईमहाराजांचे देवळांत भजनास नेहमीं जाऊं लागलों. मला लिहीतां वाचतां येत नसे. त्यावेळी काकासाहेब दीक्षीत हे भागवत वाचीत असत. मीही त्यावेळेस तें ऐकावयास जात असे. तेव्हां पुढें मला अशी इच्छा झाली कीं, आपणाला वाचतां यावें, म्हणून प्रेमानें साईमहाराजांचे समाधीजवळ जावून हात जोडून प्रेमपूर्वक साईमहाराजांस म्हणालों, बाबा मला लिहीतां आलें असतें तर मीही पण आपल्या दरबारामध्यें पोथी वाचली असती! परंतु मला तुम्ही कांहींच विद्यादान दिलें नाहीं: करितां माझें अंतःकरण अगदीं कळवळतें. मला देवा तुम्ही मूर्ख ठेवलें आहे, असे साईसमाधीसमोर उभा राहून मोठ्या कळवळ्यानें म्हणालों, व तसाच निघून भागवत ऐकावयास बसलों. पुढें दुसऱ्या दिवशीं माझ्या वडीलांनी शेळ्या विकून

टाकल्या, व मला शाळेंत घातलें, त्यावेळेस माझें वय ११॥ अकरा वर्षांचें होतें. पु साईबाबांची करणी अशी कीं, जीं मुलें मला धडा देण्याकरितां चौथे इयत्तेतुन आली होतीं त्या मुलांना मी चौथेमध्येंच गांठलें. याचें कारण असें कीं, मी एका वर्षांत तिसरीचा अभ्यास केला, व दुसऱ्या वर्षांत चौथींत बसलों' तीं मुलें नापास झाल्यामुळें त्यांची व माझी चौथीमध्येंच गांठ पडली. त्या मुलांनीं मला विचारलें कीं, हें कसें झालें ? त्यांना मीं असें उत्तर दिलें कीं, ही साईबाबाची कृपा. साई-महाराजांनीं ही विद्या मला शिकविली आहे. त्या वेळेस दाजी वामन चितांबर हे हेडमास्तर होते. पुढें मी शाळेंत पांचवीपर्यंत होतों. पुढें मीं शाळा सोडली.

## अनुभव २ रा

पुढें कांहीं दिवसांनीं मला अशी इच्छा झाली कीं, मला पोथी वाचतां यावी, परंतु तशी सोय गांवांत कोठें नव्हती. मग मी काकासाहेब दीक्षितांना म्हणालों कीं, 'तुम्हीं मला पोथी वाचावयाला शिकवितां का ' ? तव्हां ते म्हणाले, ' बाबा शिकवितील, मात्र दररोज पोथीला येत जा. ' त्याप्रमाणें मी दररोज पोथीला जाऊं लागलों. पुढें एके दिवशीं मला स्वप्नसाक्षात्कार झाला कीं, मी पोथी वाचीत आहे व बरीच मंडळी ऐकापयास बसली आहेत. त्याप्रमाणें पुढें आठ दिवसांनीं काकासाहेबानीं मला पोथी वाचावयास सांगून ते मुंबईस निघून गेले. त्या दिवसापासून मी देवळांत पोथी वाचूं लागलों. पोथी वाचूं लागलों पण मला अर्थ कांहीं कळत नसे. नुसती पोथी वाचून बांधून ठेवित असे. असा क्रम पुष्कळ दिवस चालू होता. पुढें माझ्या मनांत चिंता उत्पन्न झाली कीं, आपणास पोथीचा अर्थ अजून समजत नाहीं याला काय करावें ? मग मला श्रोते मंडळीनीं विचारलें कीं, ' तुम्ही अर्थ करून का सांगत नाहीं ! ' त्याना मी उत्तर दिलें कीं जेव्हां साई माऊली मला स्वप्नांत येऊन सांगतील कीं, पोथीचा अर्थ सांग त्या वेळेस मी अर्थ सांगण्यास सुरवात करीन. कारण विद्याही त्यानींच दिली व पोथी वाचावयास त्यानींच लाविली. व आतां पोथीचा अर्थही साई माऊलीच सांगावयास लावतील, मंडळी म्हणाली, कांहीं हरकत नाहीं. तुमची श्रद्धा साईबाबावर आहे तर तुमच्या आवडी प्रमाणें करा. पुढें वैकुंठचतुर्दशीचे दिवशीं पाहाटे ४ वाजण्याचे वेळेस, बाबा माझे स्वप्नांत येऊन म्हणाले " पोथीचा अर्थ सांगण्यास सुरवात कर. " त्या दिवसापासून मी तशी सुरवात केली आतां मी श्री. ज्ञानेश्वरीचा व श्री. एकनाथी भागवताचा अर्थ सांगण्यास सुरवात केली आहे. ज्याप्रमाणें मला साई माऊली वेळेवर अर्थ सुचवितात त्याप्रमाणें मी पोथीचा अर्थ

सांगतों; इतक्या गोष्टी कोणाच्या कृपेनें मला प्राप्त झाल्या ? तर त्या श्री समर्थ सद्‌गुरु साई बाबाच्यांच कृपेनें,

## अनुभव ३ रा

पुढें मला अशी इच्छा उत्पन्न झाली कीं, आपणांस कीर्तन करतां यावें. व त्या हेतूनें मी सुमारे अडीच हजार अभंग पाठ केले. व पुष्कळ ग्रंथांचें अवलोकन केलें. व पुढें कीर्तन करावयाचें ठरलें. परंतु कीर्तन साई बाबांचे दरबारांत झालें पाहिजे. असें माझ्या मनांत आलें. पण ही गोष्ट कोणास सांगितली म्हणजे पार पडेल असा विचार येतांच सुचलें कीं काकासाहेबांस सांगावें. त्याप्रमाणें मी काकासाहेब दीक्षित यांना म्हणालों कीं मी साई माऊली समोर कीर्तन करतों. तेव्हां ते म्हणाले कांहीं हरकत नाहीं. आज गुरुवार आहे तर संध्याकाळीं कीर्तन करा. मग मी संध्याकाळीं कीर्तनास गेलों, त्या वेळेस चितांबर मास्तर, काकासाहेब दीक्षित व आणखी कांहीं मंडळी जमवून त्या रात्रीं मी देवळांत कीर्तन केलें. तेव्हां पासून मी वारकरी सांप्रदायाप्रमाणें कीर्तन करीत असतों. ही कृपा साई माऊलीचीच आहे, कारण मी जनावरें वळणारा मनुष्य परंतु साई माऊलीनीं कृपा केली. म्हणून या स्थितीला येऊन पोंहोचलों. असो कर्ता हर्ता साईबाबा आहे.

## अनुभव ४ था

पुढें कांहीं दिवसांनीं माझें लग्न होऊन बरेच दिवस गेले. पुढें आम्ही भाऊ भाऊ वेगळे निघालों.त्यावेळेला माझ्या वाट्यास वडिलांचे हातचें कर्ज ३५० रुपये आलें तेव्हां मी अज्ञान होतों. माझी कोणाकडे कांहीं एक पतपाणी नव्हती. पुढे असें झालें कीं माझ्यावर दोन सावकारांनीं फिर्यादी केल्या. त्यामुळें मला फार काळजी लागली. त्या कर्जाच्या भीतिमुळें मी दुसऱ्या गांवीं पळून गेलों. त्या गांवाचें नांव भगवतां कोल्हाराजकराची वाडी. पुढें त्याठिकाणीं कांहीं भागेना, नंतर शिर्डीजवळ पिंपळवाडी म्हणून खेडें आहे तेथे गेलों. त्या ठिकाणीं आमच्या गरीबीनें आमची पुष्कळ फजिती उडविली. पुढें कांहीं दिवसांनी मला फार पश्चात्ताप झाला. गरीबी तर गरीबी पण कर्ज. कर्ज फिटेना तेव्हां कसें करावें काय करावें हा दशाक्षरी जप रात्रंदिवस सुरु झाला. पुन्हां पुन्हां मनास वाटे कीं कर्ज फिटत नाहीं, संसार होत नाहीं व परमार्थही घडत नाहीं. नंतर एका सावकारानें माझ्यावर दरखास्त दिली त्यामुळें माझी फारच गाळण उडाली. त्या सावकारनें मला अशी

धमकी दिली, कीं तुला मी तुरुंगांत बसवीन. मग तर जास्तच त्रेधा उडाली. पुढें असें झालें कीं, मी भिऊन दुसरे गांवीं गेलों. त्या ठिकाणीं ७ दिवस राहून साईबाबांची प्रार्थना केली हें साईमाऊली ही काय माझी फजीती. अशा जन्माला मला कां घातलें? मी मेलों असतों तर बरें झालें असतें. पण हीं फजीती कोठपर्यंत सोसावी व काळजी कोठवर करावी आतां कर्ज फेड एक, नाहींतर मरण दे एक. असे म्हणून खंती करीत तसाच झोपलों. त्या झोपेंत स्वप्न पडलें कीं बाबा येऊन म्हणालें "कांहीं काळजी करू नको, आल्ला सबका वाली है आल्ला सबका संभालनेवाला है आपके घरकू चल" तेव्हां मी लागलीच शिरडी मुकामीं आलों. व समाधी समोर उभा राहून देवास म्हणालों देवा हें असलें कर्जाचें लिगाड (लचांड) माझ्यामागें लाऊन दिलेंस व आपण स्वस्थ बसलास. हें असें कर्म त्वां कसें निर्माण केलें असे बोलून नमस्कार केला व घरीं आलों. पुढें असें वाटलें कीं भगवद्गीता शिकावी. त्यावेळेस साईबाबांचे मंदीरांत एक लिंगाईत माळी बोवा राहात असे. त्यांना मी विचारलें कीं मला गीता शिकवा. त्यांनी मला हो म्हणून सांगितलें. त्याप्रमाणें माझा भगवद्गीतेचा अभ्यास ११ वा अध्यायापर्यंत झाला, त्या दिवशीं मी रात्री झोपलों असतां मला स्वप्न पडले कीं माधवराव देशपांडे, बंकटस्वामी, कोंडाजी काका व दासगणू साईबाबा हे आलें व बाबांनी प्रत्येकाला एक एक श्लोक म्हणावयास सांगितला. त्याप्रमाणें सर्वांनी म्हटला, व मीही भगवद्गीतेचा श्लोक म्हणालों, त्याबरोबर साईबाबा म्हणाले तूं श्लोक उत्तम म्हणालास. तुला काय मागावयाचें ते माग. मी म्हटलें कीं माझें कर्ज फेड देवा. त्याप्रमाणें माझे सर्व कर्ज फिटलें. आज मितीस मी कर्जमुक्त आहे. अनंत हस्तानें देणारा भेटल्यावर माझें कर्ज फिटण्यास काय उशीर! अशी माझी कृपाळू साईमाउली आहे.

## अनुभव ५

शके १८५८ सालीं माझ्या डाव्या पायाला गुडघ्याजवळ बारीक बारीक चाळणी सारखीं भोकें पडलीं तें दुःख बरें व्हावें म्हणून पुष्कळ वैद्यांना दाखविलें. कोणी म्हणे इसब झाला, कोणी म्हणे हड्यात्रण झाला, कोणी म्हणावें हाडकाला भोकें पडतील. कोणी म्हणें बरें होणार नाहीं. कोणी म्हणे भगेंद्र झालें आहे पुढें हा रोग माधवराव देशपांडे यांना दाखविला. त्यांनीं औषधोपचार केला. परंतु त्यानें गूण आला नाहीं. नंतर कोपरगांव येथें जाऊन सरकारी डाक्टर यांना दाखविला. त्यांनें पुष्कळ उपचार केलें. पण गूण आला नाहीं. मग खासगी डाक्टर यांना दाखविला पण गूण आला नाहीं. तेव्हां

त्यांनी असें सांगितलें की, तूं नाशिकला जा म्हणजे तेथें शस्त्रक्रिया (आपरेशन) करून गूण येईल. येथें दुःख बरें होणार नाहीं.

मग मी तावडतोब निघून नाशिकला गेलों. तेथे दवाखान्यांत निजलों असतां साईबाबा स्वप्नांत येऊन म्हणाले,चल पोथी वाचावयाला,कारण विठ्ठलराव हे शिरवळला कितनास जाणार आहेत शिरडीस पोथी वाचण्यास कोणी नाहीं. चल आपल्या घरीं. तिथेंच दुखणे बरें होईल व पायाचीं भोकें बुजून जातील. त्याप्रमाणें मी दुसरे दिवशी तिसरे प्रहरा ४ वाजतां मोटारींत बसून संगमनेर येथें मुक्कामाला आलों व रात्रीं तेथेंच मुक्काम केला व सकाळीं दहा वाजतां मोटारीनें शिर्डीस उतरलों. तोंच विठ्ठलराव हातांत पिशवी घेऊन शिरवळला जाण्याकरितां मोटार स्टँडवर उभे होते. मी मोटारीखालीं उतरतांच विठ्ठलराव मला म्हणाले कीं, आप्पा पोथी वाचा बरें का ? कारण मी शिरवळ येथें जातों पोथी वाचण्यास कोणी नाहीं. बरें झालें पोथी वाचावयास आलात. तेव्हां मी त्यांना म्हटले बावांनीं मला एवढ्याच करितां आणले आहे. ही सारी साईबाबांचीच करणी आहे. असो सर्व कर्ता हर्ता साईबाबा आहे आपण नुसतें निमित्ताचें धनी आहोंत.

शिरडीस आल्यावर मी गुडघ्यास दुःखाचें ठिकाणीं फक्त बाबाची उदी लावीत असे. व त्यामुळेंच माझें दुःख बरें झालें. आतां माझा गुडघा पहिल्यासारखा झाला आहे. भोकांचे वणही राहिलें नाहींत.

या अनुभवावरून तरी श्री. विठ्ठलरावांना शिरवळास कीर्तनाकरतां जाण्याची आज्ञा बावांची आहे. देव हे निमित्त मात्र आहेत, असें दिसून येईल.

बाबा गायनप्रिय आहेत. हें महशूर आहे. देवांना 'विठ्ठलरावांच्या' गाण्याची जोड देऊन त्यांनीं श्रीदत्तजयंतीस शिरवळास श्री दत्तप्रभूंचें म्हणजे बाबांचेंच कीर्तन करावें अशी देवांना बावांचीच प्रेरणा.

बाबांना जशी गाण्याची आवड तशीच पोथची व कीर्तनाची. बाबांनीं दृष्टांत देऊन विठ्ठलरावांस शिरवळास कीर्तनाकरतां पाठविलें. व आप्पास नाशकाहून पोथी वाचण्याकरतां मुद्दाम शिरडीस आणलें. व आप्पाचा रोग बरा करून दोन्हीं कार्यें करून घेतली.

पूर्वीसुद्धां, कै. गणपतराव देशपांडे शिरवळकर शिरडीस संस्थानचें गवई असतां देव त्यांना श्रीदत्तजयंतीचें कीर्तनाकरतां शिरवळास नेत असत. पण शिरवळ जरी गणपतरावांचे घर होतें, तरी कीर्तनाचें कामापेक्षां बाबा त्यांना तेथें फाजील राहूंच देत नसत.

एकवर्षी देव यांनीं गणपतरावांस १–२ दिवस जास्त राहावयास सांगितलें, पण ते राहिनात. इतक्यांत त्याच रात्रीं त्यांना बाबांनीं स्वप्नांत येऊन सांगितलें कीं, "कायकु वास्ते रहता है यहां ? चलो शिरडीकु, हमकु गाना सुननेकु नहि मिलता है" (श्री. सा. लि. वर्ष ११ अंक ७ पान ६–७) त्याप्रमाणें ते ताबडतोब सकाळींच शिरडीस निघून गेले.

यावरून सर्वत्र ठिकाणीं व सर्व नोकर चाकरांवर व भक्तजनावर बाबांची नजर कशी आहे, त्यांच्या आवडीच्या गोष्टी ते कोणाकडून कशा करून घेतात त्यांना कसें गमू देत नाहीत हें लक्षांत येईल. कोणी आपल्या स्वतःच्या शहाणपणानें कांहीं करू शकत नाहीं सर्व सत्ता व प्रेरणा बाबांची. अमक्यानें अमुक केलें व तमक्यानें तमुक केलें हा निवळ भ्रम व वृथा अभिमान आहे.

शिरडीच्या पोथीची, गाण्याची व शिरवळच्या कीर्तनाची साइमाउलीस कितीतरी काळजी. एका कामांत तीन कामें कशीं करून घ्यावींत तें तिलाच माहीत ! ! मानव वरील तिन्ही कामांपैकीं दोन कामें करूं शकेल, पण शिरडीस आणून आपाचा रोग कोण बरा करणार ! ही अमानुष गोष्ट आहे. तिच्या ज्ञानाचें व सामर्थ्याचें वर्णन कोण करूं शकणार ! ! श्रीज्ञानेश्वर माऊली म्हणतात त्याप्रमाणें मौन या तिच्या राशि नांवास धारण करून अनन्य भावानें त्या साईमाउलीस शरण जाऊन नमन करणें हेंच भलें.

(श्री. ज्ञा. अ. १७ ओं. १५.)

ठाणें गुरुवार दिनांक ११-१-४०
मिति पौष शु. ३ शके १८६१

बाबांचें बाळ.

## "दृष्टांत व पुरावा"

मी स्वतः रामनवमीच्या उत्सवाकरितां, श्री. स. साईबाबांनी मागून घेतलेले पांघरून (शाल) घेऊन शिरडी मु॥ आज १९२७ पासून येत असतो; ह्या वर्षी सुद्धां येण्याचा बेत कायम झाला होता व माझ्या मित्र मंडळीस येण्याविषयीं विनंती केली होती परंतु ईश्वरी संकेत निराळाच आहे. "मी इथें आहे उत्सव इथेंच कर" त्याप्रमाणें मी रामनवमीचा उत्सव साजरा करण्याचा बेत कायम केला व खालील रूपरेखा आंखली.

ता. १६ रोजी सकाळी ७ वा. श्रीच्या पादुकावर अभिषेक,

१२ वा. जन्म,

३-३० वा. रा. रा. नारायण गणेश देशपांडे (कुली) यांचे प्रवचन.

प्रसाद, कॉफी पान.

परंतु श्रीच्या मनांत निराळंच आहे कारण, प्रो. एस्. एन्. चाफेकर एम्. ए. एल्. एल्. बी. पुणें. हे मुद्दाम इथें आले आहेत, व त्यांनीं आपण होऊन तुलसीदास रामायण सांगण्याचें कबूल केलें आहे. त्यांना माझ्याकडे रामनवमीचा उत्सव आहे हे माहीत नाहीं परंतु श्रीनेंच त्यांच्यामध्यें प्रेरणा करून आमचे घरी पाठवून दिलें आहे. उद्यां त्यांचा कार्यक्रम प्रभूनेंच लावला आहे.

बाबांची माझ्या घरीं अस्तित्वाचि साक्ष काल ता. १४ रोजी ज्या बिल्डींगमध्यें मी राहतो त्या बिल्डींगमध्येंच (सुशिल मॅनशन दादर) बिल्डींगच्या मालकाच्या घरीं. (पोलीस प्रॉसीक्युटर, रा. रा. रामराव कोठारे एम्. ए. एलएल. बी.) श्री गुरुचरित्राचें पारायण ५२ अध्याय, सकाळी ३-४५ ला सुरू झालें. ते संध्याकाळी ५ वा. संपलें. विघ्नें फार आली. शेवटचें विघ्न असें आहे कीं, सं. ५ वाजतां ११ ब्राम्हण व ११ सवाशिण्णीची पंगत झाली. व वरती आगाशीत पानें मांडण्यास सुरवात केली, तो बेफाम वारा सुटला व पत्रावळी उडून जाऊं लागल्या. मंडळी जवळ जवळ ३००च्या वर होती त्यांत कांहीं साईभक्त होते. उ. रा. नानासाहेब नाचणे यांनी (कुर्ला) ७ पासून ९ पर्यंत शिकस्त केली परंतु पंगत बसेना व मंडळी हताश झाली, लगेच "रा. रा. रामराम कोठाऱ्यांकडून माझ्या घरीं असलेल्या श्री. स. साईबाबाच्या फोटोजवळ नारळ ठेवून घेतला व त्यांनीं श्री. बाबांना विनंती केली कीं माझ्या हातून

काय चूक झाली असेल तर मला क्षमा करा व आलेलें विघ्न टाळून कार्यक्रम पार पाडून द्या. नारळ ठेवला आहे." ९-१५ वाजतां परत पत्रावळी ठेवल्या व सर्व मंडळी सुखरूपपणें एकाच पंगतींत बसून आनंदानें जेवली व नंतरचे सर्व कार्यक्रम चांगल्या रीतीनें व्यवस्थीत पार पडले. ह्यावरून श्री. स. बाबा माझ्या घरी आहेत व त्यांच्याच आश्रयाला हा देह राहिला आहे हे सिद्ध होते.

श्री. स. बाबांच्या हुकुमाचा ताबेदार

मधुकर,

## अनुभव

बाबांचा आणि माझा ऋणानुबंध फार जुना असावा असें मला वाटतें. माझ्या आतापर्यंतच्या ह्यातींत मला बाबांचे दर्शन घडलें नाहीं. पण अगदीं लहानपणापासून तें माझ्या मागें असावेंत असें वाटते. बालपणीं माझी प्रकृति अतिशय खराब होती. मरेन का जगेन यांची माझ्या आईला देखील खात्री नव्हती. पण माझी आजी मात्र म्हणे या पोराला कांहीं दगाफटका व्हावयाचा नाहीं. याच्या मागें कोणीतरी एक फकिरासारखा बुवा असल्याचें मला मधून मधून दिसतें.

तिचें तें म्हणणें खरें असावेसें मला वाटते, कारण जिवावर आलेल्या बऱ्याच प्रसंगांतून मी अगदीं ऐनवेळीं सहजपणें बाहेर फेकलों गेलों आहे. इथें फक्त एकाच गोष्टीचा उल्लेख करतो:–प्राणायामाचीं पुस्तकें वाचून व प्रवचनें ऐकून मी एकदां त्याच्या नादी लागलों होतो. एकदां मोठ्या इर्षेने श्वास ओढल्यावर कांहीं कृति जमून माझा प्राण थोडा वर चढला. योगाचें पुरते ज्ञान नसल्यामुळें त्यावेळीं माझी स्थिती मोठी कठीण झाली. माझें हें ध्यान जेव्हां घरांतील माणसांच्या नजरेस आलें तेव्हां ते फार घाबरले. आई तर मी मेलों म्हणून रडायला लागली होती. शेजाऱ्यापाजाऱ्यांची गर्दी जमली होती, त्यातून वाट काढत एक नाथ पंथीय फकीर आत आला व आपल्या चिमट्यानें त्यानें माझ्या टाळूवर बडवले थोडेसे रक्त निघाले पण मी लगेच शुद्धीवर आलों त्यासरशी "बाई बटा अवखळ आहे. त्याला सांभाळ"! एवढें बोलून तो गोसावी आला तसाच निघून गेला. खूप तपास केला पण नंतर त्याचा पत्ता लागला नाहीं-(नंतर तो फकीर आपण असल्याची खात्री बाबांनी मला योग्य कालीं पटवून दिली.) अशा अनेक प्रकारच्या संकटांतून बाबांनीं मला बचावलें आहे.

लहानपणीं माझे वडील फार श्रीमंत होते. पण पुढें त्यांना उतरती कळा लागली. याच सुमारास माझी स्कूल फायनल दोनदां नापास झाली. व त्यामुळें नोकरीकरतां मला गावोंगाव भटकावें लागले. बाबांची कीर्ती माझ्या कानावर येत होती पण मी जाऊं! जाऊं! असें म्हणत असतांनाच बाबा समाधिस्त झाल्याचें वृत्त माझ्या कानावर आलें. त्यावेळीं मनाला क्षणभर उद्वेग वाटला इतकेंच!

पुढें पुण्यास राहाण्याचा प्रसंग मजवर प्राप्त झाला. तेथे एका दिवशीं कै. मामा दुवे याच्या दुकानावरून जात असतां बाबांचा फोटो पाहून मी सहज त्यांची चौकशी केली. मामांनी मोठ्या आस्थेनें मला सारी माहिती व फोटो देऊन आपल्या भक्तमंडळांत सामील करून घेतले.—याच सुमारास सौभाग्यवतीचे नवमास पुर्ण भरत आले होते म्हणून मी तिला माहेरी पाठविण्याचें ठरविलें. स्टेशनवर जेव्हां मी निरोप द्यावयास गेले तेव्हां तिच्या मागें कोणीतरी एक पांढरी व भव्य आकृति उभी असल्याचें मला दिसले. मला कांहीं त्याचा उमज पडला नाहीं पण मनाला मात्र कसलीतरी हुरहुर लागून राहिली पुढें चार दिवसानंतर जेव्हां पत्र आलें तेव्हां साऱ्या गोष्टींवर प्रकाश पडला. दिवस पूर्ण भरले आहेत का नाहींत याची नीट चौकशी केल्याखेरीज पाठविण्याचा मूर्खपणा केल्या-बद्दल श्वशुरांनीं माझी खूप कानउघडणी केली होती. कारण—? होऊं नये तो अनवस्थ प्रसंग भर दुपारच्या वेळीं धावत्या गाडीत प्राप्त झाला होता. कल्पना करा! माझे वयातींत तीर्थरुप त्यावेळीं अत्यंत घाबरून गेले होते. डब्यांत दुसरें कोणीहि माणूस नव्हतें. अशा स्थितितहि माझ्या पत्नीला कोणत्याहि प्रकारचा विशेष त्रास जाणवला नाहीं, कारण बाबा सुईणीचे काम करत होते ना!

पत्र वाचून होताच माझ्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले व मी नवीनच प्रस्थापित केलेल्या साईमाऊलीच्या छबीकडे पाहिले. त्या रात्रीं प्रथमतः बाबा माझ्या स्वप्नांत आले व हसत हसत म्हणाले " अरे तुम्हा साऱ्या लोकाच जन्मजन्मांतरीचं ऋण घेतलंय मी! म्हणून पोरीची हातोहात सुटका करावी लागली " आणि मनांत आस्था बाळगणाऱ्या प्रत्येक भक्ताकडे खरोखरच बाबा मोठ्या आनंदानें धाव घेतात.

त्यावेळीं मी प्रथम शिर्डीस आलो. तेव्हां कै. सॉलिसिटर दिक्षित, तर्खड वगैरे प्रभूतींच्या गाठी पडून मला इतरांचें बरेच अनुभव ऐकावयास मिळाले व श्री साई माऊ-लींचे कार्यक्षेत्र किती अफाट आहे याची जाणीव झाली. बाबांचे नादी लागून मन रम-ल्यामुळें मी त्यांचे गुणानुवाद गाऊं लागलों परंतु घरांतील मंडळीना मात्र अजून त्यांच्या बद्दल लागावी तितकी ओढ लागली नव्हती. पुन्हां एकदा मी शिर्डीला निघालो असता (त्यावेळीं आम्ही श्वशुरगृही होतो) सौभाग्यवतीला बरोबर येण्याचा आग्रह केला परंतु

घरच्या अडचणीमुळें तिनें ते नाकारलें व सहजगत्या म्हणाली मोठे आले तुमचे बाबा !" मी निघून गेलो पण ते शब्द मात्र माझ्या मनाला बरेच लागले. पण पुढें ती जेव्हां माहेराहून परतली तेव्हां तिला बाबांचा तडाखा सोसावा लागला. बाबांनीं आपल्याला कोणत्या प्रसंगी कशी मदत केली याची जाणीव नसल्यामुळें तिच्या हातून हे घडले. पण मी सारे समजावून देताच तिचा बाबावर पूर्ण विश्वास बसला.

तदनंतर तिला पोटांत कसलासा रोग झाला व मोठमोठ्या तज्ञांची मते घेतां शस्त्रक्रिया करणें जरूर आहे असे ठरलें. पण ऑपरेशनची भीतीमय कल्पनाच तिला सहन करवेना. सारी भिस्त तिनें बाबांच्या संदेशावर अवलंबून ठेवली. माझे मन भयंकर अस्वस्थ झाले तेव्हां बाबा माझ्या स्वप्नांत आले व म्हणाले, " हे बघ, आपल्या घरांत कोणालाही कात्री लावायची नाहीं बरं का ! कात्री लावणें आणि डाग मोडणे ह्या गोष्टी बंद ! " 'मी 'बरं' म्हटलें—आश्चर्याची गोष्ट अशी की औषधाबरोबर बाबांची उदी घेतल्यानें रोग पोटातच पार जिरून समूळ नाहींसा झाला. औषध देणारा डॉक्टरसुद्धां आश्चर्यचकित होऊन म्हणाला, " हे हें नुसतं माझ्या औषधानें बरें झालेलें नाहीं साहेब ! तुम्ही आणखी कोणाची ट्रीटमेंट घेत होता काय ? " मी मनांत म्हटलें " माझा डॉक्टर धन्वतरींचा बाप आहे ! "

महिना पन्नास पाऊणशे रुपये मिळविणारा कारकून मी ! पुष्कळ वेळा पैशाची भयंकर नड लागे. पण घरातील सोन्यास हात लावायचा नाहीं असा बाबांचा हुकूम असल्यामुळें तेथें माझी मात्रा चालत नसे. पण अशा प्रसंगातूनही बाबांनी आम्हांला वाचवून आपले शब्द सुरक्षित ठेवले आहेत.

पुढें आमच्या घरांत आजाराची साथ आली. माझ्याखेरीज बाकी सगळे प्राणांतिक अवस्थेतून वाचले. एकदा मी घरांत नसता, सौभाग्यवतीची अवस्था फार कठीण झाली. पोरांनें कांहीं गडबड न करता तिला पाण्यातून उदी पाजली आणि ती शुद्धीवर आली. मला स्वतःला दम्याचा विकार आहे. एकादेवळीं रात्रीबेरात्री माझी अवस्था अशी शोचनीय होते कीं हाकसुद्धां मारण्यांचे भान मला रहात नाहीं, व वरचा श्वास वर व खालचा श्वास खाली अशा शेवटच्या अवस्थेत मीं सांपडतो. अशा अनेक प्रसंगांत आम्ही उभयता पति-पत्नी केवळ बाबांच्या आधारावरच जगूं शकलों आहोंत.

नंतर आमची पोरें आजारी पडलीं दोघांनाही बाबांनी शेवटच्या क्षणी ओढून आणले आहे. छोकरी आजारी पडली तेव्हां ती आठ वर्षांची होती. तिला कांहीं कळ

नव्हते, पण तशा स्थितीतही ती बाबांचे नांव घेई व म्हणे " मला बाबा दिसताहेत ते म्हणतात ' घाबरु नकोस, तुला कांहींसुद्धां व्हायचें नाहीं. "

१९२६ साली पोरगा मात्र भयंकर आजारी पडला. माझ्या तोंडचे पाणी पळालें होते. बाबांच्याकडे पाहून मी धीर धरला होता. अगदीं प्रथमच्या दिवशीं ते स्वप्नांत मला म्हणाले " ६० दिवसाचा विषय आहे. घाबरण्याची जरूरी नाहीं. " त्यावेळीं मी नुकताच माझ्या गावीं जाऊन परत आलों होतो व लगेच चार दिवसांनीं गुरु-पौर्णिमेकरता शिर्डीस निघण्याच्या गडबडींत होतो पण विधिघटना निराळचि ! मुलाचा आजार वाढला व शिर्डीस येणें मला अशक्य झाले. त्याची चिन्हे पाहून माझा धीर सुटत चालला. एकविसाव्या दिवशीं पहाटे त्याला शेवटचा घाम फुटूं लागला व माझ्या नाड्या थंड पडूं लागल्या. त्याला उदी लावून मी डॉक्टरला बोलवण्यांस गेलों. इंजेक्शन दिल्यावर डॉक्टर म्हणाला ' पांच मिनिटें उशीर होत होता तर केस हातची जात होती.

त्याचा ताप दोनदां उलटला. बाबांच्या छबीची स्थापना त्याच्या उशाशी केव्हांच झाली होती. एके दिवशीं संध्याकाळीं मी असाच त्याच्या शेजारी शून्य मनानें बसलों असता हातात दोरखंड घेऊन येणारा काळपुरुष मला दिसला. जिन्यावरून चढून दबकत दबकत तो खिडकीपाशीं आला व बाबांचा फोटो पहातांच किंचीत् थबकला. थोड्या वेळानें त्यानें आत प्रवेश करण्यांस पाय उचलला मात्र, हातांत आपला दांडगा सोटा घेऊन बाबा प्रविष्ट झाले. त्यांना पहातांच तो मागें सरला. तो जिन्यापर्यंत जातांच सोटा सरसावून बाबा पुढे गेले व सोट्यानें बडवून त्याला उचलून फेंकून दिले. ' पुन्हा येशील का ?' बडग्यानें बडवत बाबा विचारीत होते.

' नाहीं, नाहीं ! चुकलों !' त्यांच्या किंकाळ्यानें माझ्या कानठळ्या बसण्याची पाळी आली होती. त्याला पूर्ण हाकलून दिल्यावर स्वतः एक दोरी घेऊन बाबा पुन्हा आंत आले. आता त्याचे काम ते स्वतःच करणार की काय म्हणून मी त्यांच्याकडे पाहू लागलो. जवळचे दाभण काढून एकाद्या कुशल डॉक्टराप्रमाणें त्यानीं जिरंजवाचे पोट भराभर शिवले, व नंतर माझ्याकडे वळून ' निर्धास्त राहा ' एवढे बोलून ते फोटोत शिरले. या साऱ्या नाटकांत मी एकाद्या त्रयस्थ प्रेक्षकाप्रमाणें तटस्थ बसलों होतो. माझ्या डोळ्यांनी पाहिलेली ही खरी गोष्ट आहे.

पुढें पोरगा बरा व्हावयास व माझी बदली मुंबईस होण्यांस एकच गांठ पडली. अशा परिस्थितींत—पगार अपुरा होताच—त्याला व आम्हां इतरांना मुंबईची हवा कितपत मानवेल याचा प्रश्न पडला. अस्वस्थ मनानें मुंबईला जाऊन मी जागा सुद्धां ठरवून

आलों होतो, पण ऐनवेळी एक कारकून माझ्याशी एक्चेंज देण्यास तयार झाला व माझ्या नशिबाची मुंबईची आपत्ति टळली.

त्याचप्रमाणें मी एकदा शेतावर हुरडा खाण्यास जाणार होतो. बाबांच्या फोटोकडे पहाता मला जाऊ नये असें वाटूं लागलें, पण इतरांच्या आग्रहामुळें ऐन वेळी मला बेत फिरविणे अशक्य झाले. हुरडा खाऊन रात्री परत खोपटाकडे जात असता वाटेत एक दोरी दिसली. कशाला उगाच दोरीवर पाय टाकावा म्हणून मी त्याला ओलांडून पुढे गेलो. पुढे जाऊन बॅटरी मागे फिरवतो तोच सळ्सळ् करत सर्पराज निघून गेले. बाबांची सुचकता पाहून मी आश्चर्यानें थक्क झालो.

गत वर्षी माझा थोरला मुलगा मॅट्रीकच्या परिक्षेला बसला होता. ' प्रत्येक वर्षी पास होशील ' असा बाबांनी त्याला पूर्वीच सन्देश दिला होता पण जसजशी निकालाची तारीख जवळ येऊ लागली तसतसा तो उतावीळ झाला व त्यानें बाबांची प्रार्थना केली. त्या रात्रीं त्याला स्वप्न पडलें कीं ' आपण वर्तमानपत्र वाचीत असून आपलें नांव कांहीं लवकर सांपडत नाही ' त्याला शंका उत्पन्न झाली व दोन दिवस त्याची स्थिती ताळ्यावर नव्हती. आरती म्हणतांना ' संभाळ अपुली भाक ' हे तो जोर देऊन म्हणू लागला. त्याचे हे चाळे पाहून मला मात्र हसू येत होतें. शेवटी तो पास झाला. पहिल्या दृष्टीस त्याला आपलें नांव दिसलें. त्या रात्रीं बाबा त्याला म्हणाले, ' माझ्याविषयीं शंका घेतलीस म्हणून तुला जरा खेळवलं ! अरे, अल्लामियाचा शब्द खोटा होईल ?

फार दिवस शिर्डीस जावयास मिळालें नाहीं म्हणजे एकाद्या उत्सवाचे वेळीं मी अत्यंत दिङ्मूढ होतों. इच्छा अनावर झाली म्हणजे बाबा आपल्या चरणापाशीं आणतातच. पुष्कळ वेळ मी ऐन वेळीं रजेवर सुटलों आहे. एकदां तर ऑफिस बंद करून आमचा साहेब निघून गेला असतां मी रजा मिळविलेली आहे. त्याची हकिकत पूर्वी एकदां साईलीलेंत आलीच आहे. गेल्या वर्षीचीच गोष्ट. मला रजा मिळणें मुष्कील होत व पोरगा तर परीक्षेला बसणार होता. तेव्हां तत्पूर्वी त्याला बाबांजवळ जाऊन येऊं द्या म्हणून मी सर्वांस शिर्डीस पाठवलें. पण त्यांची रवानगी केल्यावर माझें मन अत्यंत उद्विग्न झालें. मनाची व्याकुलता प्रमाणाबाहेर जातांच साई माऊलीनें स्वहस्तें मला रजा देवविली व मी लगेच दुसऱ्या गाडीनें निघालों, या वर्षीसुद्धां चीफ क्लार्कची व माझी थोडी तक्रार होऊन रजा मिळणें कठीण दिसू लागलें. रागाच्या भरांत मी अर्ज फाडून टाकला होता. पण दुसरे दिवशी त्याच चीफ क्लार्कनें आपणहून माझी रजा मंजूर केली.

ज्यांना बाबा म्हणजे सर्वस्व वाटतात त्यांना बाबांचे फार लवकर अनुभव येतात. आमच्या नात्यातल्या एका म्हातारीनें आमच्याकडून बाबांचा फोटो नेला व यथासांग तऱ्हेनें ती त्याचे पूजन करू लागली. तिचा मुलगा मॅट्रीक पास होऊन बसला होता व त्याला नोकरी कधीं लागेल या काळजींत ती असे. शेवटीं बाबांनीं एके दिवशीं स्वप्नांत तिला एक कागद आणून दिला व दुसऱ्याच दिवशीं तिच्या मुलाला नोकरीचा कॉल आला. त्यामुळें बाबांवर त्यांची श्रद्धा बसली.

एकदां तो मुलगा पुणतांबे येथें असतां श्रीचांगदेवाची यात्रा त्या समयीं आली. पुण्यतिथीच्या दिवशी तो गोदावरींत स्नान करण्यास गेला असतां त्याचा पाय निसटला व तो वहात गेला. साधारणपणें त्याला पोहतां येत होतें पण त्यावेळेस मात्र इलाज चालेना. बाबांचे नांव घेत तो कसाबसा पाण्यावर तरंगत असतां एका बाजूला फेकला गेला व आपोआप त्याचा पाय एका दरडीवर टेकला, आपणाला कोणीतरी उचलूनच ठेवत आहे कीं काय असा त्याला भास झाला. आजुबाजूचे लोक नुसते पहात बसले होते.

मनांत कोणती शंका आली की बाबा तिचें निवारण करतात. गेल्या साई-लीलेच्या अंकांत एका मद्रासी भक्तानें बाबांच्या तीर्थाचा कुंभ मागितला होता व त्याला छिद्र असताही पाणी गळून गेलें नाहीं, हा मजकुर वाचून मला फार आश्चर्य वाटलें. त्यावर बाबा स्वप्नांत म्हणाले ' अरे, अजुन काय झालय ? अजुन लई होईल '–' बाबा मशिदीला द्वारकामाई म्हणत. त्यांत कांहींतरी गुडार्थ आहे. पूर्वीं द्वारका तेथें असली पाहीजे या संबंधींचा लेख पूर्वीं साई-लीलेंत आला होता. मलाही तें बरेचसे पटले. तेव्हां बाबा स्वप्नांत म्हणाले, ' अरे त्याचे म्हणणे खरे आहे ! '

बाबा नेहमीं म्हणत 'अरे, अल्लामियाच्या सांगण्याप्रमाणें जो वागेल त्याला दुनिया बहाल करील. ' त्यांच्या एका प्रचलित भक्ताविषयीं त्यानी एक विस्मयकारक गोष्ट सांगितली ती पुढीलप्रमाणें—"उत्तर हिंदुस्थानांत माझा एक भक्त आहे. जज्ज आहे. (उत्तर हिंदुस्थानांतल्या स्टेटमधल्या एका जज्जाची हकिकत नुकतीच Shree Sai Baba या इंग्रजी पुस्तकांत माझ्या वाचनांत आली आहे. तेव्हां तेच हे असतील तर त्यानीं कृपा करून या गोष्टीचा पडताळा पहावा व समग्र साईभक्ताकरतां जरुर तो खुलासा करावा–अशी मी त्यांना विनंति करतो ) माझ्या सांगण्याप्रमाणें तो वागत आला म्हणून त्यांचे फार कल्याण झालें. एकदा काय झालें–त्यांच्या दारावरून एक भाजीवाला जात होता. त्यांच्या आचाऱ्यानें त्याला आत बोलावले व कोबीची का कसल्यातरी भाजीची किंमत विचारली. माळी म्हणाला ' तीन–चार आणे ! ' त्यावर तो आचारी म्हणाला ' छट् ! कुठले ३-४ आणे ! बाजारांत तर एक आण्याला मिळते ' असे म्हणून त्यानें त्याच्याजवळचे गड्डे

काढून घेतले व त्याला तसेच हाकलून दिले तो बिचारा रस्त्यानें ओरडत चालला 'बघा हो, एवढ्या मोठ्या साहेबाचा बंगला ! पण त्यांच्या माणसांनी मला गरीबाला तसेच हुसकून लावले !'' तिकडून रावसाहेब येत होते, त्यांच्या कानी ते शब्द पडले, त्यांनी त्याला सगळी हकिकत विचारली व आपल्या बंगल्यावर नेऊन सारी चौकशी केली, नंतर त्या आचाऱ्याला योग्य शासन करून त्यांनी त्या बागवानास दहा रुपयांची नोट बक्षिस दिली.

अशा तऱ्हेने वैभवानें आणि त्याप्रमाणें मनानेही थोर असे अनेक साईभक्त विद्यमान आहेत हें आपणांस केव्हांही भूषणास्पद आहे.

इतकें बोलून मी हे माझें थोडके बोल पुरें करतों.

इत्यलम्.

एकनाथ प्रल्हाद सुगांवकर, सोलापूर

# List of books about Shri Sai Baba.

——:o:——

Madras books available at Sai Samsthan, Shirdi, P. O. Dist Ahmednagar Rahata and with:—

Rao Saheb B. Papaiya Chetty, 55, Stroten Muthia Mudail Street, Madras.

| | |
|---|---|
| Introduction to Shri Sai Baba by B. V. N. Swami | |
| English, Malayalam, Tamil, Telugu, Canarese & Urdu | 0–2–0 |
| Experiences of Devotees of Shri Sai Baba by | |
| B. V. N. Swami ( English ) part 1 .... | 0–4–0 |
| " " " " 2 ... | 0–4–0 |
| " " (in Tamil) Part 1 ... | 0–4–0 |
| Madras Devotee's Experiences ( English ) ... ... | 0–4–0 |
| The above three English books bound in half calico ... | 0–12–0 |
| " " " " in wrapper ... | 0–10–0 |
| Namawali ( i. e- 108 names of Sai Baba ) In Sanskrit, | |
| Telugu, Tamil, Malayalam, Canarese. each ... ... | 0–0–6 |
| Sai Leela (in Telugu) by Rao Saheb B. Papaiya Chettiar. | 0–8–0 |
| Sai Stava ( " ) by Satavadani Doma Venkatswamy Gupta. | 0–2–0 |
| Sai Sadgeeta (Tamil) songs set to music by Sow. S. Rajam | 0–1–0 |
| Sai Sangita Kirtan ( " ) by Sow Amritam ... ... | 0–1–0 |
| Sai Pooja Vidhi in Tamil for Sanskrit ... ... | 0–1–0 |
| Sai Manasa Pooja ( Sanskrit ) ... ... ... .. | 0–1–0 |

For Gujrathi:—

" Guru Smriti, " " Manache Shloka " & " Hari Path " write to Mr. Wamanrao Prangovind Patel, Head master, Society School, Umreth Dist. Kaira.

For Coloured pictures of Sai Baba:—

write to Mr. D. V. Sambare, Tejpal Road, Vile-Parle and to Rao Saheb B. P. Chetty, 55 Strothen Muthi Mudali Street, Madras.

For lockets of Baba:—

Write toMr. A. S Gopalakrishnan, West Boulevard Road Trichinopoly

**For Authentic Photos of Sai Baba:—**

write to Mr. R. V. Ghaisas, Editor Sailila, Dadar. ( sizes availa[ble]
card, cabinet, little bigger locket and bigger, enlargement. )

As.

**For Guide to Shirdi in English:—**

write to the clerk, Shirdi Sansthan, at Shirdi, Post Raha[ta]
Dist. Ahmednagar

All correspondence regarding Shri Sai Leela should be ad[d]ressed to–Editor Sai Lila, GokhaleRoad (North), Dadar, Bombay 1[4]


छातीचे विकारांवर

सांडू ब्रदर्स यांचें

# हार्टिना

**Regd.**

( HEARTINA )

## HEARTINA

Excellent Heart Tonic

छातींत कळा येणें, सुई टोंचल्या सारखं वाटणें, छातींत घबराट होणें, फुप्फुस विकार, High Blood Pressure इत्यादि विकारांवर रामबाण.

बा. किं. रु. ३ (ट. ख. नि.)

सविस्तर माहिती साठीं लिहा:—

**द. कृ. सांडू ब्रदर्स,**

आर्यौषधि कारखाना.

**चेंबूर--मुंबई.**


**सूचना:—**कोणास जाहिराती देणें असल्यास खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा
रामचंद्र वासुदेव घैसास लो.टिळक ज्युबिली ट्रस्ट बिल्डिंग नं.२,गोखलेरोड नार्थ,दाद[र]

Printed at Calendar Press, Dadar and Published by R.V. Ghaisas–Loka[manya] Tilak Jubilee Trust Bldg. No.2, Gokhale Rd. North Dadar, Bombay 1[4]